## पाळ गोडसे

१९६९
म. ग्रं. सं. ठाणे
य काव्य
क्र. १९९७

# जय मृत्युंजय



REFBK-0017543
REFBK-0017543

का १८४/
७४४९५
११।३।७१

१८८१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४४९५ वि: काव्य
क्रमांक १८८१ नोंद दि. ११।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ
समृद्ध योजना
१८७०



# गाथ मृत्युंजय

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावरील कविता

गोपाळ गोडसे

REFBK-0017543
REFBK-0017543
9६५८३

केसरी प्रकाशन, पुणे २

प्रकाशक :

ज. श्री. टिळक

केसरी प्रकाशन

५६८ नारायण पेठ

पुणें २

*

© गोपाळ गोडसे

*

प्रथमावृत्ति

मकरसंक्रमण, शके १८९०

१४ जानेवारी १९६९

*

मूल्य ७ रुपये

*

मुखपृष्ठ व सजावट :

अनंत सालकर

*

मुद्रक :

ज. श्री. टिळक

केसरी मुद्रणालय

५६८ नारायण पेठ

पुणें २



तीर्थस्वरूप
सौ. जानकीबाई नरहर
अभ्यंकर
यांच्या सेवेसी -

# पुरस्कार

'जय मृत्युंजय' हा भारताचे आद्य-क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या महान् जीवनाचा गोपाळ गोडसे ह्यांनी काव्यांत गायिलेला स्फूर्तिदायक सारांश होय. स्वातंत्र्यवीरांचें जीवन एवढें विविध आणि विशाल होते की, व्यास वाल्मीकीसारख्या महाकवींची काव्यप्रतिभाहि त्यांचें वर्णन करतांना पांगळी पडली असती. 'रघुवंशा'वर महाकाव्य लिहितांना कविकुलगुरु कालिदासाला जसें वाटलें की, 'क्वसूर्यप्रभवोवंश: क्वचाल्पविषया मति: । तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम्', अगदी तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांवर महाकाव्य गाऊं इच्छिणाऱ्या महाकवीला वाटावें एवढें सावरकरांचें चरित्र सागराप्रमाणे अमर्याद आणि दुस्तर आहे.

वीर सावरकर हें कांही नुसतेच राजकीय क्रांतिकारक नव्हते. ऐतिहासिक, सामाजिक धार्मिक, वाङमयीन असे जीवनाचें कोणतेहि क्षेत्र नव्हतें की ज्यांत सावरकरांच्या क्रांतिकारक बुद्धीने महान् पराक्रम करून भारताच्या विशाल क्रांतीचा पाया विसाव्या शतकांत घालून ठेवला नाही. विद्यमान काळाच्या ते फारच जवळ असल्याने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या क्रांतीचें ऐतिहासिक मूल्यमापन करणें सध्यातरी पराकाष्ठेचें अवघड असल्याने भविष्यकाळांत तें कार्य जेव्हा कोणी इतिहासकार करतील तेव्हा ते करोत. सध्याच्या काळीं त्यांच्या क्रांतिकारक जीवनाची गौरवसूक्तें गाण्यापलीकडे त्यांच्या चरित्रकारांना, कवींना नि शाहिरांना दुसरें कांही करतां येणार नाही. तेंच कार्य थोडक्यांत गोपाळ गोडसे ह्यांनी मोठ्या भक्तिभावाने आणि तल्लीनतेने केलेलें आहे. ज्या महापुरुषाने मृत्यूला जन्मभर अनंत आव्हाने देऊन आपल्या देहाचा कणकण आयुष्यभर जाळला नि भारताच्या स्वातंत्र्याचा नंदादीप तेवत ठेवला त्या मृत्युंजय नरकेसरीचा हा अमर जीवनपट आहे.

पहिल्या सत्तावन्नी स्वातंत्र्यसमराचा स्फूर्तिदायक वारसा घेऊन सावरकर जन्माला आले. त्यामुळे त्यांच्या धमन्याधमन्यांतून पारतंत्र्याच्या द्वेषाचे नि स्वातंत्र्य-प्रेमाचे रक्त जन्मापासूनच उसळ्या मारूं लागले. म्हणूनच वयाच्या पंधराव्या वर्षीं आपल्या देवघरांतल्या अष्टभुजा देवीच्या मूर्तीपुढे त्यांनी घनघोर प्रतिज्ञा केली की, 'देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारतां मारतां मरेतों मी झुंजेन !' त्या प्रतिज्ञेंतूनच मृत्युंजय सावरकर जन्माला आले.

लोकमान्य टिळकांसारख्या युगप्रवर्तक नेत्याचें स्फूर्तिदायक वरदान अगदी बालपणापासून सावरकरांना लाभले आणि त्यांच्याच प्रेरणेने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या

अग्निकुंडांत त्यांनी उडी घेतली. उच्च शिक्षणाचें निमित्त करून ते ब्रिटिश साम्राज्याच्या केंद्रस्थानीं गेले. केवळ स्वदेशांत केलेल्या प्रयत्नांनी भारताच्या पारतंत्र्याचे पाश तुटणार नाहीत तर त्यासाठी क्रांतीची आंतरराष्ट्रीय संघटना उभारली पाहिजे आणि भारतीय स्वातंत्र्य हें जागतिक प्रयत्नांतून निर्माण झाले पाहिजे हें क्रांतीचें द्रष्टेपण सावरकरांच्या अंगीं वयाच्या पंचवीसाव्या वर्षीच प्रकट झालें. त्या दृष्टीने महात्मा गांधी, लोकमान्य टिळक नि नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनी पुढे जे प्रयत्न केलें त्याची मुहूर्तमेढ त्यांच्या कितीतरी वर्षे आधी सावरकरांनी ब्रिटन, फ्रान्स नि युरोपमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर रोवली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याच्या जागतिक संघटनेचें पहिले सूत्रधार म्हणून त्यांचें नांव मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहावें लागेल !

सावरकरांनी आपल्या क्रांतीकार्याला प्रभावी तत्त्वज्ञानाची सामर्थ्यवान जोड दिली–‘एक देव – एक देश – एक जाति – एक जीव – एक भाषा – !’ आणि भारतीय ऐक्याची, राष्ट्रवादाची नि समाजवादाची तुतारी आसेतु हिमाचल फुंकली. सावरकरांच्या मागून देशांत अनेक पक्ष, पुरोगामी विचारसरणी आणि देशकल्याणाचे अनेक कार्यक्रम आले, पण एक देश - एक जाति – एक भाषा ह्या त्यांच्या त्रिसूत्रीवर मात करील असा विचार ह्या क्षणापर्यंत जनतेपुढे कोणीहि मांडलेला नाही. सावरकरांच्या महात्म्याच्या यशाचें हेंच खरें बीज आहे.

त्यानंतर सावरकरांच्या अग्निदिव्य पर्वाला प्रारंभ झाला. त्रिखंडांत गाजलेली त्यांची फ्रान्सच्या किनाऱ्याजवळील समुद्रांतली उडी, अंदमानांतले भयानक काळेपाणी, दोन जन्मठेपीच्या शिक्षा, क्षणाक्षणाला समोर डोकावणाऱ्या मृत्युला न भीता तुरुंगाच्या भिंतीवर काट्यांनी त्यांनी कोरून ठेवलेले अमर काव्य–हीं त्यांच्या रौद्र जीवनांतील एकेक प्रकरणें म्हणजे शेक्सपीअरलादेखील जें लिहिता आलें नसतें असें एकेक भीषण नाट्य आहे ! मृत्यूवर जय मिळवितांना जगाचें इतिहासांत कोणीहि माणूस एवढ्या त्वेषाने आणि तिडिकेने मृत्यूच्या छाताडावर थयथया नाचला नसेल !

देशाला स्वातंत्र्य मिळालें. मृत्युंजय सावरकरांचें महान् स्वप्न साकार झालें. अनेक हुतात्म्यांचें बलिदान सफल झाले, पण ‘सिंधु’ मुक्त झाली नाही एवढें एकच दु:ख सावरकरांच्या काळजाचे लचके तोडीत मागे राहिले.

**मुक्त आजला गंगा यमुना**
**गोदावरि अन् सरस्वती ।**
**आणि नर्मदा कावेरी परि**
**‘सिंधु’ कुठे मुक्त भारती ।**

‘हिंदु’ हें राष्ट्र म्हणून पोखरलें जात आहे, दुबळें होत आहे. कारण परधर्माच्या निष्ठेला बिलगलेले लोक आपली सांस्कृतिक, धार्मिक, पौराणिक, राजकीय नि

म्हणून राष्ट्रीय निष्ठा भारताबाहेर ठेवीत आहेत. प्रत्यक्ष राष्ट्रान्तराची ही पूर्वसिद्धता आहे. म्हणून 'धर्मांतर हेंच राष्ट्रान्तर होय' हा आक्रोश सावरकर किती वर्षांपासून करीत आहेत! भारतीय जनतेला नि राज्यकर्त्यांना त्यांनी दिलेला तो इशारा किती अचूक आणि खरा आहे. त्याचा भयानक प्रत्यय आता या घटकेला सर्वत्र येऊं लागला आहे.

ज्या मृत्यूला सावरकरांनी जन्मभर अशा रीतीने ऊंबरठ्याबाहेर उभे करून ठेवलें, त्याला त्यांनी आपण होऊन घरांत बोलावलें. आणि "एका जन्मांत जेवढें होणें शक्य होतें तेवढें झालें, मी धन्य झालों – आता जगणें म्हणजे भार आहे – माझें कार्य झालें, मी चाललों!' असें म्हणत मृत्युंजयांनी आपल्या महान् शरीराचें आत्मार्पण केलें. जीवन महान्, तपश्चर्या महान्, आणि मरणहि महान्! अशा ह्या मृत्युंजय महापुरुषाच्या जीवनाचें महान् सार कालानुक्रमाने गोडसे कवींनी मोठ्या बेहोष जिव्हाळ्याने आणि उन्मादक रसिकतेने थोडक्यांत वर्णन केलें आहे. त्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत!

'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दाने गावा नि शूर मर्दाने ऐकावा।' असे शिवकालीन अगिनदास शाहीर म्हणतो. त्याचा प्रत्यय 'मृत्यूंजयाचा हा पोवाडा' वाचतांना पदोपदी येतो, हेंच गोपाळ गोडसे ह्यांच्या मर्द शाहीरीच्या यशाचें बीज आहे. यापेक्षा अधिक काय लिहावें?

शिवशक्ति, **– प्रल्हाद केशव अत्रे**
१७ मे १९६८.

# हेतु

हिंदुराष्ट्राचा द्रष्टा हरपला होता. त्याचें शव त्याच्या राहत्या घरीं लोकांच्या दर्शनासाठीं ठेवलें होतें. लोक येत होते, दर्शन घेत होते, करुणेने ओथंबलेल्या हृदयांतून अश्रु झरत होते, थरथरते हात फुलें वाहात होते.

इतिहासाचें पान उलटलें होतें. अवकळेच्या वातावरणांत जनसमुदाय तरंगत होता. मीहि त्यांतलाच एक कण होतों.

कुंद झालेलें वायुमंडल अधून मधून सावरकरांनी केव्हातरी म्हटलेल्या कवितांनी हालत होते. कानावर शब्द येत होते. –

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला ।।

साठ वर्षांपूर्वीची परिस्थिति आणि नंतरची स्थित्यंतरें यांचें कांही वाचन, श्रवण, कधीं दर्शन आणि मनन वेळोवेळीं झालें होतें. तो 'स्मृतिपट' डोळयांपुढून सरकत होता.

समुद्रपार अडकलेला प्राण मातृभूमीला जाण्यासाठी कासावीस झाला होता. स्वातंत्र्यमंडित मातृभूमि पाहणें हें त्याचें तेव्हाचें स्वप्न होतें. आंग्लसत्ता आणि त्या सत्तेचें समुद्रावरील स्वामित्व त्या स्वप्नाला फार मोठें अडसर होतें.

कालांतराने ते अडसर दूर झाले होते. सावरकर स्वतंत्र मातृभूमींत वास्तव्य करीत होते.

एका जन्मांत करतां येण्याजोगें त्यांनी केलें होतें. आता त्यांना तळमळ लागली होती अज्ञाताला परतण्याची, पंचमहाभूतांत पुन्हा विलीन होण्याची. पहिल्याइतकीच हीहि तळमळ तीव्र होती. आयुष्यांत एकदांच करतां येतें असें आमरण उपोषण त्यांनी त्यासाठी प्रारंभिले होते.

त्यांना कोणावर दडपण आणावयाचे नव्हतें, अमुक करा नाहीतर मी अनशन करुन मरेन असला हेका त्या उपोषणामागे नव्हता. उपोषण प्रामाणिक आहे हें दाखविण्याचा आटापिटा नव्हता. मरण-यातनांचें चित्रण भक्तांकरवी लोकांच्या डोळयांसमोर नाचविण्याचा हव्यास नव्हता.

सावरकरांनी आपलें उपोषण तडीस नेलें त्यांनी मुक्ती मिळविली. लोक बघत होते तें त्या जीवन्मुक्ताचें कलेवर !

त्या पार्श्वभूमीवर, 'सागरा प्राण तळमळला' हे शब्द हृदयाला कापत जात होते.

स्वातंत्र्यवीरांच्या कलेवराचें विद्युद्दहन झाले आणि खेद नि वेदना अंत:करणांत साठवून लोक घरोघर परतले. मला वाटले जें तत्त्वज्ञान चिरंतन आहे असा प्रत्यय आला तें तत्त्वज्ञान सांगणाऱ्या तत्त्ववेत्त्याची आणि त्याच्या तत्त्वज्ञानाची ओळख नव्या पिढीलाहि व्हावी. त्यासाठीं जयमृत्युंजय या काव्यमालेचा प्रयास आहे.

**– गोपाळ विनायक गोडसे**

# ऋणनिर्देश

स्वातंत्र्यवीरांच्या प्रयाणानंतर कांही दिवसांनी मी या कविता लिहिण्यास घतल्या. सहा गीतें लिहून झालीं. मग मी " गांधी हत्या आणि मी " या लेखमालेंत गुंतलों. तें काम हातावेगळें झाल्यावर पुन्हा कवितांकडे मन वळविलें.

पण निवान्तपणा मिळण्याजोग्या जागेची अडचण होती. श्री. राजाभाऊ धोकटे यांच्याशीं योगायोगाने ओळख झाली होती. स. प. महाशालेमागे त्यांचें घर आहे. त्यांनी आपल्या घरीं या लिखाणासाठी माझी सोय केली. त्यांच्याजवळ असलेला ग्रंथसंग्रह-सुद्धा त्यांनी माझ्या उपयोगासाठी दिला.

श्री. जयंतराव टिळक यांनी गीतमाला पुरी करण्यास प्रोत्साहन दिलें. दि २५–२–६८ ते २८–५–६८ या कालांतील पंधरवड्याच्या रविवारीं अधलीमधलीं गीतें 'केसरीं'त प्रसिद्ध झालीं. पुस्तक प्रकाशित करण्याचें श्री. जयंतराव टिळक यांनी मनावर घेतलें.

हातांत असलेलीं इतर कामें, कवितांना अनुरूप चित्रें, ठसे अशा अटळ अडचणीं-तून पार पडतां पडतां कितीतरी महिने गेले आणि आज पुस्तकाने आकार घेतला.

सर्वश्री बबनराव कुलकर्णी, प्रभाकर जोग, दत्ता डावजेकर, सुधीर फडके, जितेन्द्र अभिषेकी, हृदयनाथ मंगेशकर, सी. रामचंद्र, प्रभाकर भालेकर, दशरथ पुजारी आदि नामवंत संगीतकारांनी आणि संगीत दिग्दर्शकांनी जयमृत्युंजयमधील कवितांना चाली दिल्या आहेत. आणखी कांहीजण देत आहेत. कांहींनी गाणी स्वरमुद्रित करून दिली आहेत.

या सर्व खटपटीसाठी कोणाचा न कोणाचा हातभार लागला आहे. कै. श्रीमती शांताबाई अप्पासाहेब पंडित (मुंबई) यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सुविद्य कन्या सौ. शकुंतला वसंत केतकर यांनी १०१ रुपये या पुस्तकासाठी दिले आहेत. इतरांचा नामनिर्देश करण्याची मला मोकळीक असती तर मला अंशतः अनृणी झाल्यासारखें वाटलें असतें.

आचार्य अत्रे यांनी ही गीतमाला वाचली आणि प्रस्तावना लिहिली. त्यांची सावरकरभक्ति त्या प्रस्तावनेंतूनहि दिसून येत आहे.

या सर्व साहाय्यभूत व्यक्तींचा मी ऋणी आहे.

**— गोपाळ विनायक गोडसे**

# सदिच्छा

जय मृत्युंजय हा कविता-संग्रह पूर्ण झाला. मी तो श्री. भाऊराव (न. गो.) अभ्यंकर यांना दाखविला.

आज तीन तपें श्री. भाऊराव यांची हिंदु-संघटन कार्याशीं एकरूपता झालेली आहे. सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक संस्थांपासून राजकीय संस्थांपर्यंत त्यांचा संबंध आला आहे. ते वेळोवेळीं त्या त्या संस्थांचे पदाधिकारी राहिले आहेत.

मी लिहिलेला कवितासंग्रह वाचल्यावर श्री. भाऊरावांना राहवलें नाही आणि आपणहिं कांही आशीर्वादात्मक आणि अभिप्रायात्मक ओळी लिहाव्यात अशी त्यांना प्रेरणा झाली. पद्यरचनेशीं तसा कधीं संबंध नसतांना त्यांनी ज्या ओळी लिहिल्या त्या पद्यांत ! श्री. भाऊराव यांच्या सदिच्छांचें प्रतिबिंब उमटलेली ती कविता जशीच्या तशी येथे दिली आहे –

विनायकाप्रति निःसिम भक्ती
देई शक्ती कवनाला ।
ना तरि कैसी येई स्फूर्ती
गोपाला या कथनाला ।
कसा विनायक असे तयाचे
तत्त्वज्ञान जगतारणहार ।
वर्णु न शकतील दिग्गज कविवर
कीर्ति जयाची जगी अपार ।।
मिटो भिन्नता उभे राहु दे
एकावयवी राष्ट्र महान् ।
वैभवशाली पराक्रमी तरि
जगदोद्धारा हेंच निदान ।
वीर विनायक या मंत्राचा
असे न केवळ द्रष्टा मुनिवर ।
सिद्ध करी तो मंत्र विनायक
सर्व वेंचुनी जीवनसार ।।
सिद्ध मंत्र हा ग्रहण करोनी
उठले, उठु दे वीर अपार ।
पराक्रमाने बुद्धिबळाने
ध्येय गाठुया हा निर्धार ।
सेतुबंधना पूर्ण कराया
वानर मानव झटले वीर ।
टिट्वी त्यामधि झटे बळाने
घडो तसा हा गानप्रचार ।।

जय मृत्युंजय

# कविताक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | तो वीर विनायक अमर | २ |
| २ | तो काळ असा होता | ४ |
| ३ | विनायक आला जन्माला | ६ |
| ४ | उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं | ८ |
| ५ | मूर्ति दुजी ती | १० |
| ६ | दंग आज तांडवांत | १२ |
| ७ | घेअि लाडके घास निरोपाचा | १४ |
| ८ | गुरुदेव टिळक त्या शिष्य विनायक | १६ |
| ९ | विलायती जाळा वस्त्रें | १८ |
| १० | आव्हानाया रिघे विनायक | २० |
| ११ | अेक देव, अेक देश | २१ |
| १२ | झालासां उत्तीर्ण परीक्षा | २२ |
| १३ | देशा अर्पण हें आत्मार्पण | २४ |
| १४ | अेकमुखाने करुनि हकारा | २६ |
| १५ | अमर होय ती वंशलता | २८ |
| १६ | तडितरूप योद्धा कडाडला | ३० |
| १७ | ध्यान पाहुनी गोष्टीवरती | ३४ |
| १८ | सन्मित्रांनो घ्या प्रणाम | ३६ |
| १९ | फेकला देह मी सागरीं | ३८ |
| २० | सोडा रक्तांत खेळणें | ४० |
| २१ | दोन जन्म काळें पाणी | ४२ |
| २२ | दगड मोगरी मधे सापडे | ४४ |
| २३ | तेंचि हो संसाराचें सार | ४६ |
| २४ | त्या डब्यांत होती मृत्यूची छाया | ४८ |
| २५ | अंदमानला निघे चलान | ४९ |
| २६ | तात्या तूं इथे कसा ? | ५० |
| २७ | अंदमानचा अनभिषिक्त नृप | ५२ |
| २८ | येसूवहिनी | ५४ |
| २९ | कविता खेळत होती | ५८ |
| ३० | चाफ्याचें फूल | ६० |
| ३१ | कांचन चमचमलें | ६२ |
| ३२ | भूमिची लावली धूळ भाळाला | ६३ |

३३ हिंदु राष्ट्रध्वज . . . . . ६४
३४ जातपात गुणकर्मे येती . . . . . ६५
३५ विजयाचा सण आला . . . . . ६६
३६ लेखण्या मोडा . . . . . ६७
३७ गाणें माझें गाऊं द्या . . . . . ६८
३८ रोख सैनिकांचा फिरवा . . . . . ६९
३९ पाकिस्तान निर्माण कराल तर – . . . . . ७०
४० देश दास्यांतुनी मुक्त झाला . . . . . ७२
४१ गांधीहत्या अभियोग . . . . . ७४
४२ अभियोगांतून सुटका . . . . . ७७
४३ पराक्रमाने पुन्हा सोडविल . . . . . ७८
४४ धर्मान्तर हें राष्ट्रान्तर . . . . . ८०
४५ जन हो मागुनि माझ्या आलां . . . . . ८२
४६ नृप मीच भारताला . . . . . ८४
४७ राष्ट्रपतिपद राहो ज्याचें त्याला . . . . . ८६
४८ दैव देतें कर्म नेतें . . . . ८७
४९ गोवा मुक्ति-यज्ञ . . . . . ८८
५० माओींचा मृत्यू . . . . . ९०
५१ सेना समरांगणीं रंगली . . . . . ९२
५२ होऊं मी का भार धरेवर . . . . . ९४
५३ तुझें रे कळलें जीवनसार . . . . . ९६

# कार्यक्रमासंबंधी

नाटक, लोकनाट्य, कवितागायन इत्यादि कार्यक्रम मूल्य लावून सार्वजनिक ठिकाणीं करण्याचें झाल्यास महाराष्ट्र शासनाच्या रंगभूमि परिनिरीक्षण मंडळाकडून तें लिखाण आधी तपासून घ्यावें लागतें. मंडळाने 'जय मृत्युजय 'ला योग्यताप्रमाणपत्र दिलें आहे. त्याचा क्रमांक व्ही.ई. टी. ६८, दिनांक ३–१२–१९६८ आहे. त्या योग्यता प्रमाणपत्रांत अटी आहेत.

(१) पृष्ठ ७०–७१ कविता क्र. ३९ "पाकिस्तान निर्माण कराल तर" ही संपूर्ण कविता (गद्यासहित) म्हणू नये.

(२) पृष्ठ ७२-७३ कविता क्र. ४० "देश दास्यांतुनी मुक्त झाला" या कवितेंतील कडवें आठवें, ओळी, "चार सीमांतला, भ्रांतिने जो दिला। भाग तो आपला, पाहिजे घेतला" म्हणू नयेत.

(३) पृष्ठ ८०–८१ कविता क्र. ४४ "धर्मांतर हें राष्ट्रान्तर" या कवितेंतील कडवें सहावें पूर्ण (ख्रिस्तोपासक येत कासया...इत्यादि) म्हणू नये.

मंडळाने घातलेल्या अटी योग्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दूर करून घेतल्या जाईपर्यंत वर उल्लेखिलेले भाग म्हणतां येणार नाहीत. अटी दूर करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे.

कांही कवितांच्या ओळींतील अन्त्य अक्षर पाय मोडून अपूर्ण केलें आहे तें गायनाच्या सोयीसाठी.

अंतिम उपमुद्रितांतून म्हणजे प्रुफांतून निसटलेले कांही मुद्रणदोष लक्षांत आले.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २५ | २६ | आम्हां | अम्हां |
| ५९ | शीर्षक | वेळत | खेळत |
| ६३ | शीर्षक | भूमीची | भूमिची |
| ६३ | शीर्षक | माळाला | भाळाला |
| ७८ | २१ | पहिल्या ? | पहिल्या |
| ७९ | ५ | विजयावांचुनी | विजयावांचुनि |

नवोदित गायकांचें सहकार्य घेऊन 'जयमृत्युंजय' चे कार्यक्रम करण्याचा मानस आहे. यासंबंधीचा पत्रव्यवहार १२०६।१ (ब) शिवाजीनगर, पुणें-४ येथे करावा.


— गोपाळ विनायक गोडसे

: २८ मे १८८३ ]

[ मृत्यु : २६ फेब्रुवारी १९६६



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 9483
मुंबई शाखा (स्थळ



वाटिकेंतल्या सुमांचा तुझ्या
धाष्ट्यानें मी केला संचय
हृत्तंतूंनी गुंफिलीं फुलें
आणि शिंपिलें भक्तीचें पय
राष्ट्रासाठी राहिलास तूं
मृत्यूच्याही दारीं निर्भय
म्हणुनी गातों जीवनगाथा
जय मृत्युंजय जय मृत्युंजय !

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या एके काळच्या सहकाऱ्याला त्याचीं मुलें सावरकरांचा जीवनपट विचारीत आहेत.

## १

जाळुनी जन्मभर कणकण निज देहाचा ।
ठेविला तेवता दीप स्वातंत्र्याचा ।।
तो वीर विनायक अमर, ऐकलें आम्हीं ।
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ।। ध्रु० ।।

निष्ठेने आपण मार्गें त्याच्या जातां ।
देशाचें मंगल गाणें गातां गातां ।
बंधनांत संगति बंद-घराच्या होतां ।
तो कसा जाहला अग्रणि या देशाचा ।।
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ।। १ ।।

परिसलें, विनायक परदेशाला गेला ।
मित्रांचा संचय तेथे त्याने केला ।
भरभरुनि पाजला देशभक्तिचा पेला ।
अन् आपण प्याला घोट सुखें दुःखाचा ।।
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ।। २ ।।

उड्डाण सागरीं म्हणती अद्भुत राही ।
सांगती, मृत्युने दार खोललें नाही ।
रिपु मात्र करी त्या पाशबद्ध लवलाही ।
परवशतेने त्या होत दाह अंगाचा ।।
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ।। ३ ।।

जयजयकारा तो स्वातंत्र्याच्या बोले ।
स्वातंत्र्यशिबिर जें अंदमानचें केलें ।
वाग्स्पर्शें ज्याच्या पतीत पावन झाले ।
तो शब्द कसा हो असे पुण्य वीराचा ।।
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ।। ४ ।।


# तो वीर विनायक अमर

म्हणतात, शारदा जिव्हाग्रावर होती।
आलाप उमटतां करती अंकित भिंती।
रणभेरी झाल्या त्या कवनांच्या पंक्ती।
केव्हा फुटली त्या भित्तिपटांना वाचा ॥
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ॥ ५ ॥

ध्वज एक हिंदुला, राष्ट्र एकची त्याला।
हा मंत्र, सांगती, दिधला तैं आम्हांला।
झटला तो करण्या बलशाली देशाला।
तो विशद करा हो मंत्र अम्हां धैर्याचा ॥
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ॥ ६ ॥

भारतासि म्हणती नव्हता कोणी वैरी।
परि धजला होता समराला शेजारी।
मग झाली जागी निद्रित जनता सारी।
अंगिकार केला सावरकर-शब्दाचा ॥
इतिहास कथा ना, तात, अम्हांला त्याचा ॥ ७ ॥

सांगती सैन्य जें लाहोरावरि गेलें।
वीरास वाटलें, तनुचें सार्थक झालें।
मृत्युला तयाने मग पाचारण केलें।
घातला तयाच्या मुखीं घास देहाचा ॥
इतिहास कथा ना, तात अम्हांला त्याचा ॥ ८ ॥



१८५७ च्या विफल क्रांतीनंतर हिंदुस्थानांत स्थूलपणें तीन प्रकारचे विचारप्रवाह होते. एक ब्रिटिशांचें राज्य उत्तम आहे, ती ईश्वरी देणगी आहे, इंग्रज आमचें कल्याण करतील अशी धारणा असणारा; दुसरा स्वदेशनिष्ठा जागृत असणारा; घटनात्मक आणि नैर्वंधिक कक्षेंतून स्वराज्य मिळूं शकेल अशी या विचारवंतांची धारणा होती. तिसरा सशस्त्र क्रांतीनेच स्वराज्य मिळेल, एरव्ही नाही, अशी धारणा असणारा. तिसऱ्या विचारप्रवाहाचीच इंग्रजांना प्रामुख्याने भीति असे.

सत्तावन्न नंतर ब्रिटिशांना पहिला हादरा बसला तो पंजाबांत १८७२ मध्ये कुकांचा उठाव झाला त्याचा. रामसिंग कूका यांचें ब्रह्मदेशांत निष्कासन केलें गेलें. तेथे १८८५ मध्ये त्यांचा अंत झाला.

ब्रिटिशांचें अधिक लक्ष वेधावें असा त्यानंतरचा उठाव वासुदेव बळवंताचा झाला, तो १८७८ मध्ये. त्यांना १८७९ मध्ये पकडलें आणि एडनला त्यांचें निष्कासन केलें. तेथे १८८३ मध्ये त्यांचा अंत झाला.

विष्णुशास्त्री चिपळूणकर आदि स्वदेशनिष्ठेचे अग्रणी महाराष्ट्रांत निर्माण होत होते. ते क्रांतिनिष्ठ पक्ष रुजण्यास जणू भूमीच नांगरून देत. १८८३ मध्ये लोकमान्यांचा 'केसरी' अवतरला. क्वचित् विझला असें वाटणाऱ्या क्रांतिनिष्ठ

# २

क्षणाक्षणाला छळत भारता होती परवशता,
कठिण तो काळ असा होता ।। ध्रु० ।।

सत्तावनला कुंड पेटलें, धगधगल्या ज्वाला,
चालुनि गेलें सैन्य, घातला शत्रुवरी घाला ।
नेते होते तात्या टोपे, धुंडिराज नाना
झांशीची संग्रामदेवता, संगर करतांना – ।
अडला घोडा परदास्याला उल्लंघुनि जातां,
कठिण तो काळ असा होता ।। १ ।।

अत्याचारा वाव मिळाला अतां इंग्रजांना,
माणुसकीचा अंश अल्पही उरला ना त्यांना ।
तोफेवर बांधून मारती स्वदेशभक्तांना,
कितीक पडती बळी बंदुकी आग वर्षतांना ।
अंदमान दाटलें, कितींच्या फास येत हाता,
कठिण तो काळ असा होता ।। २ ।।

उपशम झाला क्रांतीचा त्या, मात्र मनीं होती –
स्वातंत्र्याची तीव्र भावना कोठे धगधगती ।

पक्षाला त्यांच्या सहवासांत पुन्हां उत्थान मिळाले. वासुदेव बळवंतांच्या क्रांतीची स्मृति नवी नवी होती. पुढे चाफेकर बंधु, रानडे, यांचें हौतात्म्य झालें. तो क्रांतिकारी प्रवृत्तीचा परिपाक होता.

१८८५ मध्ये ह्यूम यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय राष्ट्र सभा (इंडियन नॅशनल कॉंग्रेस) या संस्थेचा उदय झाला. क्रांतिनिष्ठ पक्षाला आळा बसावा आणि लोक तथाकथित घटनात्मक मार्गाने आपल्या मागण्या मांडण्यास उद्युक्त व्हावेत हा त्या मागील हेतु होता. राष्ट्रसभेचे पुढारी राजनिष्ठ असत. ते तशी शपथ राष्ट्रसभेच्या पीठावरून घेत.


पण राष्ट्रसभेच्या कल्पनेंतून एकराष्ट्र या कल्पनेलाहि बळकटपणा आला. पुढे पुढे, घटनात्मक मार्गांतून केलेले प्रयत्न वायफळ असतात हेंहि नेत्यांच्या लक्षांत आलें. राष्ट्रसभेचें नेतत्व स्वदेशनिष्ठ व्यक्तींकडे जाऊं लागलें. १८९५ मध्ये पुण्याच्या अधिवेशनावरील वाद राजनिष्ठ रानडे पक्ष विरुद्ध स्वदेशनिष्ठ टिळक पक्ष यांतील होता.

१८८३ मध्ये सावरकरांचा जन्म झाला. पूर्वीचा काल आणि बालमन संस्कारक्षम असतें तेथवरचा काल, या सर्वांचा परिणाम त्यांच्या मनावर कोरला गेला होता. क्रांतिनिष्ठा हा त्यांचा मार्ग ठरला. ओघानेच अपार कष्ट त्यांच्या वांटयाला आले.

## तो काळ असा होता

मधुनी कूका, वासुदेव, ती ज्वाला चेतविती,
इंग्रजांस आगीवर होती सदाचीच भीती।
कुणास देती दंड, कुणाला पदव्यांचा भत्ता,
कठिण तो काळ असा होता ॥ ३ ॥

निराशेंतुनी राष्ट्रसभेचा तदा जन्म झाला,
एकराष्ट्र-भावना मात्र ये तेव्हां उदयाला।
महाराष्ट्र-केसरी क्षणीं त्या क्षितिजावर आला,
आशा वाटे सह्याद्रीची भारतमातेला।
स्वातंत्र्याचा दुष्कर त्याच्या करीं वसा होता,
कठिण तो काळ असा होता ॥ ४ ॥



वातावरणीं अशी राहिली धूमिल योगयुती,
जन्मुनि तेव्हां करीत होता विनायक प्रगती।
लिही तयाच्या कष्ट अपेष्टा भालावरि नियती,
अंगावरले घाव तयाचे जीवन भूषविती।
वज्राचे आघात झेलण्या सिद्ध सदा नेता,
कठिण तो काळ असा होता ॥ ५ ॥

वैशाख कृ. ६, शके १८०५ ला – म्हणजे दि. २८–५–१८८३ ला – बाळ विनायक भगूर या नाशिकच्या परिसरांतील गावीं जन्मला. त्याच्या बुद्धीची चमक लहानपणीच दिसूं लागली होती. त्याला कविता करण्याचा आणि वाचनाचा नाद फार लहान वयांत लागला.

# ३

कशाचा सोहाळा झाला? विनायक आला जन्माला।
माता देई देशभक्तिचें स्तन्य बालकाला।
विनायक आला जन्माला ।। ध्रु० ।।

राधा दामोदर दंपतिचें प्रेम परस्पर दृढ राही।
भगूर होतें गाव सानसें धुनी दारणा जलवाही।
साहित्याचा छंद पतीला पत्नी गृहकृत्यें पाही।
सुस्थितिहुनिही उभय मनांची श्रीमंती नांदे गेहीं।
कामीं आली ती श्रीमंती स्वदेशकार्याला।
विनायक आला जन्माला ।। १ ।।

दीप लाविती भक्तीनें ते मदनाच्या मंदिरीं।
ज्योतीच्या तेजांत वेंचिली माणिक मोती करीं।
पतिपत्नीचें भाग्य उजळलें, कौस्तुभ त्यां लाभला।
मंजूषा उदराची केली तेथें सांभाळला।
सूर्यदर्शना गमे कौस्तुभा समय इष्ट आला।
विनायक आला जन्माला ।। २ ।।

शक अठराशें पांच संगती ऋतुराजाला घेत करीं।
वैशाखाच्या वद्यपक्षिच्या षष्ठी तिथिचा योग धरी।
भुवीं सोडुनी अंश नियतिचा काल आपला मार्ग धरी।
राधा-दामोदर दंपतिच्या देई तो दायित्व शिरीं।
मातापित्यांनी स्वागत केलें वाढविलें बाला।
विनायक आला जन्माला ।। ३ ।।

# विनायक आला जन्माला

स्वयंप्रकाशी अंश जणू हा सूर्याचा कवडसा ।
मातेचें सौंदर्य पित्याच्या शौर्याचा वारसा,
मखरामध्यें वात्सल्याच्या वाढत गेला जसा ।
मावेना आनंद नभींही तन्मातेचा तसा ।
हृदयाशीं त्या कवटाळी अन् घेत चुंबनाला ।
विनायक आला जन्माला ।। ४ ।।

संस्कृतिचा त्या असे पाळणा, संस्कृतनें डोलतो ।
आरण्यक-उपनिषदांसंगें आनंदे बाल तो ।
चाळा म्हणुनी शिशू बोबड्या छंदांनीं बोलतो ।
लघुपंडित हा वादविवादीं शब्दांना पेलतो ।
तेजाचा कण शिशु सावरकर कुलभूषण झाला ।
विनायक आला जन्माला ।। ५ ।।



बाल विनायक तेव्हा सात एक वर्षांचा असेल. शाळेच्या मधल्या सुट्टींत तो घरीं आला. बहुधा खाण्यावरून रुसवा फुगवा झाला. आईशीं बोलणें झालें नाही. पुन्हा शाळेंत जाईतों आईच्या प्रेमळ शब्दांचा लाभ आज आपणांस मिळाला नाही याची त्याला जाणीव झाली. पण वेळ गेली ती गेलीच. तरी पण, कल्पाच्या अंतीं दुसरें कल्प उगवतें आणि सर्व घटना आणि घडणी जशाच्या तशाच पुन्हा घडतात असें त्याने वाचलें होतें. त्या वेळीं आपण रुसावयाचें नाही असें त्याने ठरविलें. क्षणभराने विचार आला की, सर्वच घटना जशाच्या तशाच घडणार हें जर खरें असेल तर माझें रुसणेंसुद्धा तसेंच घडणार! पुन्हां मन विषण्ण झालें.

विनायक नऊ वर्षांचा झाला, तेव्हा त्याची आई निर्वतली. त्या वियोगानंतर याहि आठवणीने विनायकाचें मन उद्विग्न होणें स्वाभाविक होतें. ही हळवी आठवण सावरकरांनी आपल्या आठवणींत लिहून ठेवली आहे.

## ४

**उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।।**
**होती माझ्या मनीं अहंता; बंधूने डिवचली ।**
**सुप्त असूया उसळूनि आली सारी चित्तांतली ।**
**रुसलों, उठलों, शाळेला मी निघे त्याच पावलीं ।**
**आणि आठवे, मुकलो तव मी प्रेमळ शब्दावली,**
**माउली प्रेमळ शब्दावली ।**
**उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।। १ ।।**

**अज्ञ तुझा मी बालक माते, तुझा आसरा मला ।**
**सांगे मी सर्वांस माउली! मन्माता प्रेमला ।**
**पश्चात्तापें जळलों आई, कोप सर्व लोपला ।**
**उपदेशाचा तुझ्या भुकेला पुत्र उभा ठाकला,**
**आइ गे, पुत्र उभा ठाकला ।**
**उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।। २ ।।**

**म्हणती फेरा कल्पानंतर यापरि येतो पुन्हा ।**
**माता मजला तूंच, कल्पना देत मना सांत्वना ।**

# उष्ण आसवें नेत्रीं जमलीं

भेटशील ना कल्पांतीं मज दोषाच्या क्षालना ।
नाहि पुन्हा रुसणार, मला तूं हृदयीं धरशील ना,
माउली, हृदयीं धरशील ना
उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।। ३ ।।

आणि जाणवे झणि, कल्पांतर पुनरपि आल्यावरी ।
रुसवाही अनिवार्य, अबोला मातेचा त्यापरी ।
विषण्ण होई तेव्हा बालक, मनीं प्रार्थना करी ।
झाल्या गोष्टी विसर जन्मदे अपराधी मी जरी,
माउली, चुकलों असलों तरी ।
उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।। ४ ।।



गेले होते प्राण, कलेवर मातेचें राहिलें ।
नसे चेतना तिला पुसाया पाणी नेत्रांतलें ।
आक्रोशा पाहून यापरी जनमन हेलावलें ।
मातेवांचुनि विनायकाला रुक्ष जिणें वाटलें,
तयाला रुक्ष जिणें वाटलें ।
उष्ण आंसवें नेत्रीं जमलीं, पुसावया ती कुठे माउली ।।५।।

विनायकाच्या पणजोबांनी एकदा लुटारूंशीं सामना दिला आणि लुटारूंच्या देवतेची मुख्य मूर्ति घरीं आणली. ही अष्टभुजा देवीची मूर्ति पुढे सावरकर घराण्याचें कुलदैवत झाली.

विनायक लहानपणीं भक्तिभावाने तिची पूजाअर्चा करी. इतिहासाचें आणि परिस्थितीचें अवलोकन करतां करतां त्याने ख्रिस्ताब्द १८९८ मध्ये देवीपुढे प्रतिज्ञा

५

अष्टभुजा देवीची मूर्ति सुंदरा,
मातामह तातांचे आणिती घरा ।
शौर्याचा तो प्रसाद, ती महाकृती,
कुलदैवत गेहाचे म्हणुनि वंदिती ।
भक्तांना प्रेम जिचे नेत्र दाविती,
दंडण्यासि दुष्टजनां क्रुद्ध हो अती ।
जी रुधिरप्रिय होती,
जीस मत्त अरि भीती,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। १ ।।

ज्येष्ठ बंधु बाबा हो या विनायका,
भगिनी माई कनिष्ठ काव्यनायका ।
नारायण बंधु असे पाठचा तिला,
शोभविती भावंडें आपल्या कुला ।
जनक आणि जननीची वाटिका फुले,
प्रेमाच्या कौमुदींत वाढतीं मुलें ।
माधुरी विनायकासि भक्तिची असे –
देवीच्या, तो निवान्त मंदिरीं बसे ।
तेजाने लखलखती,
शस्त्रांचीं करिं पातीं,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। २ ।।

अभ्यासा बाल विनू लागला जसा,
जागली प्रवेगानें ज्ञानलालसा ।
वाची तो वृत्तपत्र, आपली स्थिती
पाही त्या दर्पणांत आणि भोवतीं ।
चिंती अपुल्या मनांत, भूप भारता –
इंग्रज कां, आपली कुठे स्वतंत्रता ।
अष्टभुजेपुढति करी ध्यानधारणा,
आळवी, मला देवी शक्ति दे रणा ।

केली की, यापुढे मी देशाचें स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मारितां मारितां मरेतों झुंजेन ! या प्रतिज्ञेंतून अभिनव भारत या संस्थेचा उगम झाला. ही शपथ म्हणजे विनायकाच्या आणि देशाच्या जीवनाशीं संबद्ध असलेल्या रक्तपात, आघात, प्रत्याघात, वध, फाशी, वनवास, छळ, यश, अपयश, दौरात्म्य, हौतात्म्य, प्रकाश, अंधार, आगीचे लोळ, धुराचे कल्लोळ अशा घटनांची नांदी ठरली.

# मूर्ति दुजी ती

भक्तांना दे स्फूर्ती,
व्हावया कराल कृती,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। ३ ।।

वय वाढे कार्याचा व्याप वाढला
मित्रांचा नासिकला संघ काढला ।
मोंगल सत्ता महान राहिली जरी
शिवबाने निर्मिले स्वराज्यही तरी ।
व्हावा समहेतू मजला अशक्य कां
भक्तीची सुप्तता पुसे विनायका ।
जी त्यातें प्रिय होती,
रणचंडी उग्रमती,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। ४ ।।

चाफेकर बंधूंचें दिव्य ऐकलें,
आणि तयें नासिकचे मित्र पेटले ।
पोवाडे करित आणि गात संगतीं,
काव्यांतुनि, कंठांतुनि आग ओकती ।
बाजी प्रभु गात कुणी, कुणि तानाजी,
स्वातंत्र्यप्रेम कुणी, कोणि शिवाजी ।
अतिधरेसम पङ्क्ती,
जोपासुनि कवि घेती,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। ५ ।।



वाटलें विनायकासि, कां न मी स्वतां –
क्रांतिने करावयासि मुक्त भारता ।
व्हावें कटिबद्ध या क्षणासि, अन्यथा –
राहिल चिरदास्याची भारता व्यथा ।
देवीतें बोले, हे प्राण जोंवरी,
शत्रूला मारित झुंजेन तोंवरी ।
खड्गहस्त शिवमूर्ती,
केतूची करि पूर्ती,
संचरे विनायकांत मूर्ति दुजी ती ।। ६ ।।

विनायक आणि गणेश (बाबा) शिक्षणासाठी नाशिकला राहिले होते. तेथील दातार कुटुंबाशीं सावरकर कुटुंबाचा घरोबा झाला होता.

पुण्यांत गेल्या दोन तीन वर्षांत ग्रंथिज्वराचें थैमान होतें. १८९८–९९ मध्ये तो रोग नाशिक आणि नाशिक परिसरांत पसरला. वे. शा. सं. केशवशास्त्री दातार यांचें त्यांत निधन झालें. लोक गाव सोडून जाऊं लागले. बाबा आणि विनायक भगूरला गेले. धाकटा भाऊ बाळ भगूरलाच होता.

पण पाठोपाठ साथहि तेथे पोचली. मार्च १८९९ मध्ये दामोदरपंतांचा अंत झाला. बाळला लागण झाली. बाबाचें लग्न झालें होतें. त्याची पत्नी येसूवहिनी

# ६

दंग आज ताण्डवांत, भीषण आलाप गात ।
नरसमिधा ग्रंथिज्वर, शोधतो घराघरांत ।। १ ।।

पाला जणुं नरजीवन, पवनाला करिं घेउन ।
झाडितसे यम वसुधा उत्तर शिशिरासमान ।। २ ।।

खेंची यम तात कुणी, कोणाची वा गृहिणी ।
पुत्र, बंधु, कन्या वा, ओढतो घशांत झणीं ।। ३ ।।

एकामागून एक एकदाचि वा अनेक ।
शय्येवरि मरणाच्या घटकेने होत खाक ।। ४ ।।

भरले संसार आज ध्वस्त करी धर्मराज ।
हास्य करी तो भेसुर घालुनिया मुंडसाज ।। ५ ।।

आर्तस्वर आक्रंदन ऐकुनिया बधिर कान ।
अटलें जल नयनांतिल गावांचें हो स्मशान ।। ६ ।।

अर्भकें अनाथ किती दीन दिगंबर फिरतीं ।
एकचि आधार तयां भू खाली नभ वरती ।। ७ ।।

पुरली ना पुण्यपुरी गेला नासिक नगरीं ।
वेढलें भगूर तयें जनतेचे प्राण हरी ।। ८ ।।

बाळची शुश्रूषा करीत होती. चुलते बापूकाका मुलांकडे बघूं लागले. वेशीजवळील महादेवाच्या मंदिरांत ही मंडळी राहूं लागली.

बापूकाकाहि रोगाला वळी पडले. बाबांनाहि लागण झाली बाळ आणि बाबा बरे झाले.

पद्मपत्र पाण्यांत कोरडें राहावें तसें विनायकाला रोगाचा उपसर्ग पोचला नाही. देशाचें भवितव्य त्याच्या शिरावर ठेवण्याची नियतीची इच्छा होती तेंच त्याचें कारण होतें काय ?

## दंग आज तांडवांत

धिंगाणा रोगाचा अंत करी ताताचा ।
सावरकर बालकांसि आता कर काकाचा ।। ९ ।।

हाय ! कोसळे अंबर तो आधाराचा कर ।
मृत्युच्या निजे मुखांत आणि पिलें वाऱ्यावर ।। १० ।।

बाळ आणि बाबावर फिरवी जिव्हा कठोर ।
रुचि वाटे कडवट जणु सोडला तयें विचार ।। ११ ।।

पाण्यांतचि पद्मपत्र, कोरडें ! किती विचित्र ।
ना शिवे विनायकासि कालाचें मृत्युसत्र ।। १२ ।।

विधिने अपुल्या मनांत योजिलें विनायकांत ।
नायकत्व देशाचें करण्या भू शत्रुमुक्त ।। १३ ।।



रोगांतून उरलेले लोक स्वत:ला सावरत होते. मुलें शिक्षणासाठी नाशिकला गेलीं. विनायक शालान्त वर्गांत होता. घरावर कोसळलेल्या आपत्तीमुळे शिक्षण आणि उच्च शिक्षण कसें पुरें करावयाचें असा त्याला प्रश्न होता. वडील बंधु बाबांना विनायकाच्याच शिक्षणाचें फार महत्त्व होतें. कारण त्याच्यांत कांही विशेषता आहे हें त्यांनी ओळखलें होतें. विनायकचा विवाह ठरवावा, तो ठरवतांना श्वशुरांना विनायकचें शिक्षण पुरें करण्यास सांगावें अशी योजना बाबांनी योजिली.

## ७

घेइ लाडके या सदनाचा घास निरोपाचा ।
उत्सव तव गे पाठवणीचा तुझ्या मंगलाचा ।। १ ।।

विनायकाचा कर भाग्याचा येई तव हाता ।
तूं चिपळुणकर-सुता जाहलिस सावरकर आता ।। २ ।।

दोन कुळांचा दुवा ठराया जन्म कन्यकांचा ।
सामावुनि घे वरकुल, वाढे वंश मानवाचा ।। ३ ।।

भ्रतार यमुना, चतुर देखणा भक्त शारदेचा ।
विद्याव्रत-सांगतेंत होइल धनी संपदेचा ।। ४ ।।

विशाल होइल सदन तुझें गे भरुनी संसार ।
धनधान्यानें भरलें राहिल घरचें कोठार ।। ५ ।।

द्वैताला विसरून यापुढे अद्वैता ठेवा ।
एकत्वाचा अन्य घरांना वाटावा हेवा ।। ६ ।।

पण लहान वयांतच विचाराला प्रगल्भता येत असलेल्या विनायकाला वाटत असेल –

तारुण्याचें उत्साहाचें वय आयुष्याचें ।
व्रत घेण्याचें आणिक शपथा पूर्ण करायाचें ।। ७ ।।

एकाकी मी नसे यापुढे व्रतपूर्तीसाठीं ।
एक तरी मज अधिकाराचा मित्र असे गाठीं ।। ८ ।।

विनायकच्या मामांच्या मध्यस्थीने जव्हार संस्थानचे प्रधान चिपळूणकर यांची कन्या माई हिच्याशीं विनायकचा विवाह मार्च किंवा एप्रिल १९०१ मध्ये झाला. विनायकचें शिक्षण पुरें करण्याचें श्वशुरांनी मान्य केलें.

मुलीची पाठवणी करतांना जगरहाटीप्रमाणे तिच्या माता-पित्यांनी तिला निरोप दिला असेल, उपदेश दिला असेल आणि आशादायी आशीर्वादहि उच्चारला असेल —

## घेइ लाडके घास निरोपाचा

विनायास चालतो यौवनीं कुलवर्धनगाडा ।
व्यर्थ असे स्वातंत्र्यावांचुन भव्य राजवाडा ।। ९ ।।

सर्वस्वाच्या त्याग-परिमलें भरेन संसार ।
राहिल भरलें धनधान्याने भारत-भांडार ।। १० ।।

कुटुंबापरी एकजीव मी भारत घडवीन ।
उत्कर्षाचें मानवतेच्या युद्ध रंगवीन ।। ११ ।।

विवाह नाही अडसर मातें तें तर वरदान ।
व्याप्ति वाढली सर्वस्वाची, वाटे अभिमान ।। १२ ।।



विनायक १९०१च्या डिसेंबरमध्ये नाशिकला शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाला. शिक्षणासाठी आणि कार्यासाठी नाशिकचें क्षेत्र अपुरें पडलें. तो पुण्याला फर्ग्युसन महाशाळेंत गेला. मुलाने माजघरांतून अंगणांत यावें तसें विनायकाचें कार्यक्षेत्रहि वाढलें.

लोकमान्य टिळक राष्ट्राचें नेतृत्व धडाडीने करीत होते.विनायकाला तें आकर्षण फार प्रबल होतें. पुण्याच्या वास्तव्यांत विनायक लोकमान्यांशीं विचारविनिमय करी. लोकमान्यांनी चालू केलेल्या शिवजयंत्युत्सवासाठी विनायकाने शिवरायांना अवतार घेण्यास आवाहन करणारी आरतीहि केली होती.

## ८

जन्मजात जागृत अपुल्या अधिकाराला ।
गुरुदेव टिळक, त्या शिष्य विनायक झाला ।। ध्रु० ।।

उलगडे भूमिवरि काल नव्या शतकाला ।
अंगणीं विनायक माजघरांतुनि आला ।
गोदातट सोडी शिक्षण वाढविण्याला ।
गुंफाया किंवा क्रांतिदेविला माला ।
लोकमान्य होती स्फूर्ति विकल देशाला ।
गुरुदेव टिळक, त्या शिष्य विनायक झाला ।। १ ।।

केसरी परिसरी एकत्रावे छावे ।
विस्मृत शौर्याचें जिथुनि शिक्षण घ्यावें ।
उन्मत्त शक्तिला परकी आव्हानावें ।
दंष्ट्रा-नखरीं गज-गंडस्थळ फोडावें ।
उघडतां अशी तें क्रांतिची महाशाला ।
गुरुदेव टिळक, त्या शिष्य विनायक झाला ।। २ ।।

कार्यासि मिळावें अधिष्ठान देवाचें ।
पाठीसि असावें दैवत सामर्थ्याचें ।
गणराय, शिवाजी, म्हणुनी पूजायाचें ।
इह-अध्यात्माचें सूत्र लोकमान्यांचें ।
आंदोलन-मंदिर विशाल उभवायाला ।
गुरुदेव टिळक, त्या शिष्य विनायक झाला ।। ३ ।।

## गुरुदेव टिळक त्या शिष्य विनायक

आर्यांच्या देशीं म्लेंच्छांचा ये घाला ।
सावध शिवराया ! पुनरपि घे जन्माला ।
दास्याने केलें दीन हीन आम्हांला ।
तं शक्त ! ये प्रभो दुःख निवारायाला ।
काव्यांत विनायक विनवी शिवरायाला ।
गुरुदेव टिळक, त्या शिष्य विनायक झाला ।। ४ ।।



विनायकाच्या फर्ग्युसनमधील वास्तव्यांत ज्या महत्त्वपूर्ण घटना घडल्या, त्यांत परदेशी कपडयांची होळी ही प्रमुख होती. वंगभंगाच्या निषेधाचा एक तीव्र प्रकार म्हणून पुण्यांत परदेशी कपडयांची होळी करण्याचा घाट विनायकाने घातला. वर्ष १९०५ मधील दसऱ्याला (ऑक्टोबर १९०५) ही होळी झाली. लोकमान्य टिळक, भालाकार भोपटकर, काळकर्ते शिवरामपंत परांजपे आदि नेते या उपक्रमांत सहभागी झाले होते. इंग्रजांचे डोळे त्रस्त करणारी ही होळी होती.

९

बहिष्कारिण्या परदेशी वसन भारतांत ।
योजना विनायक योजी छात्रमंडळांत ।
विलायती जाळा वस्त्रें, छात्र गर्जतात ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। १ ।।

सजविती फुलांनी गाडा मार्ग आक्रमाया ।
वाजतात वाद्यें नाना देश जागवाया ।
प्रेम जागतां देशाचें लोकमानसांत ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। २ ।।

देशमुक्ति साधाया हे यागकार्य आहे ।
त्याग याच यागासाठी देश मागताहे ।
भक्तिने विनायक सांगे राहुनी पुढयांत ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। ३ ।।


हळू हळू स्वातंत्र्याची होत वाटचाल ।
भरे मार्ग, भरला गाडा, वाहिला गुलाल ।
'त्याग भारतायस्वाहा' मंत्र गात गात ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। ४ ।।

# विलायती जाळा वस्त्रें

स्मशानांत गेली यात्रा, वन्हि चेतवीला ।
घाबरें धुराने केलें आंग्लशासनाला ।
भूमि तप्त झाली, ज्वाला पोचती नभांत ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत
पुण्यपत्तनांत ।। ५ ।।

देशभक्ति लोकांमध्ये चेतवीत होते ।
परांजपे, भालाकर्ते, टिळक आदि नेते ।
सांगती, रिपूला फेका सप्तसागरांत ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। ६ ।।

चिता होत इतिहासाचें पान एक साचें ।
येथुनी विनायक साही घाव पावकाचे ।
जन्म जाळण्याच्या बांधी तोरणा चितेंत ।
लोक लक्तरें दास्याचीं फेकती मखांत,
पुण्यपत्तनांत ।। ७ ।।



जय मृत्युंजय

विनायक स्नातक झाला. इंग्लंडला जाण्याचें, हा हेतु त्याच्या मनांत होता. आणखी शिक्षण घेणें, विधिपंडित होणें, हा प्रकट हेतु होता. तर इंग्लंडमध्ये राहूनच हिंदुस्थान-भोवतीं इंग्रजांनी बांधलेले पाश सोडविण्याचा यत्न करणें हा त्याचा अंतस्थ हेतु होता.

पंडित शामजी कृष्ण वर्मांनी देऊं केलेली शिवाजी शिष्यवृत्ति लोकमान्यांच्या भलामणीने विनायकाला मिळाली.


# १० आव्हानाया रिघे विनायक

राजा लंडनमधुनि चालवी हिंदुभूमिशासना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। ध्रु० ।।

देशांत आपल्या उच्च परीक्षा दिली ।
सन्मान्य शिवाजी शिष्यवृत्ति मिळविली ।
ठेविली मनीं अन् शिवबाची साउली ।
सागर पृष्ठावरी आंखली स्वारीची योजना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। १ ।।

क्रांतीचें रुजलें बीज तेथ सत्वर ।
वाढलें रोप, रक्षणा हात कणखर ।
त्या हातामागे निष्ठा बलवत्तर ।
जमली सेना विद्यार्थ्यांची देशाच्या मोचना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। २ ।।

भारतांत घडलें संगर सत्तावनी ।
स्मरणार्थ साजरी केली एकावनी ।
आंग्लभू हदरली, चिंतित झाली मनीं ।
शत्रूच्या गोटांत विनायक ठाके आयोधना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। ३ ।।



अन् एके दिवशी थरारली ही धरा ।
बलिदान करितसे मदनलाल धिंगरा ।
ठेवण्या वाहता रिपुरक्ताचा झरा ।
घ्या उसंत ऐकाया त्याची मातृभूमि वंदना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। ४ ।।

शमविण्या क्रांतिला इंग्रज सत्तापती ।
क्रांतिच्या नायका शृंखलांत बांधती ।
कोंडती वीज वा ज्वालामुख झाकती ।
केलें दृढ मन तयें भोगण्या अंधारीं यातना ।
आव्हानाया रिघे विनायक रिपुच्या सिंहासना ।। ५ ।।

इंग्लंडमध्ये अभिनव भारताचें क्रांतिकार्य एकीकडे चालू असतांनाच हिंदुस्थानचें वैचारिक, सामाजिक किंवा राष्ट्रीय अभंगत्व कसें राहील इकडेहि सावरकरांचें लक्ष होतें.


मानस्थान एक राहिलें तर तें अभंगत्व टिकेल, हिंदुस्थानशीं धार्मिक, भौगोलिक, ऐतिहासिक, पारंपारिक, भाषिक, अध्यात्मिक निष्ठा एक असली पाहिजे ही भूमिका होती.

आजहि अशी निष्ठा न ठेवणारे फुटून निघूं बघतात असा अनुभव येतो.

## ११ एक देव एक देश

एक देव एक देश एक आशा । एक जाति एक जीव एक भाषा ।
आंग्लभूवरी भारतीय रत ।
राष्ट्राचें भवितव्य रंगवित ।
कसा असावा अभिनव भारत ।
मित्रांचा गण होता गात् ।
करूं संकटावरती मात् ।
खरा करूं पण ।
लढवोनी रण ।
घडवूं आपण –
एक देव एक देश एक आशा । एक जाति एक जीव एक भाषा ।। १ ।।

रणरंगण शब्दांकित करिती ।
आणि चरित्रें उदात्त लिहिती ।
विस्फोटक-संहिता शोधिती ।
युक्ति शक्तिचा घालित मेळ् ।
रसायनाशीं करिती खेळ् ।
क्रांतीचें घर ।
भारत मंदिर ।
करण्या आतुर –
एक देव एक देश एक आशा । एक जाति एक जीव एक भाषा ।। २ ।।



वंग पंचनद आंध्र हिमाचल ।
महाराष्ट्र गुजरात नि उत्कल ।
एका भूचे प्यालेले जल ।
मातृभक्तिची एकचि हाव् ।
एकरूप झालेले भाव् ।
हृदयीं कोरत ।
जय जय भारत ।
सर्वांचें व्रत –
एक देव एक देश एक आशा । एक जाति एक जीव एक भाषा ।। ३ ।।

जय मृत्युंजय

इंग्लंडमध्ये विनायक विधीची परीक्षा उत्तरला. विधिपंडित – बॅरिस्टर – झाला. पण पदवीचीं वस्त्रें त्याला देण्याच्या संबंधांत अधिकारीवर्गांत कांही चर्चा झाली. कारण क्रांतीच्या आंदोलनाचीं प्रकरणें त्यांच्या निदर्शनास आणलीं गेलीं होती.

ग्रेज इन संस्थेच्या अधिकारीवर्गाने मे १९०९ मध्ये निर्णय घेतला की, सध्या पदवीचीं वस्त्रें देऊं नयेत. दोन महिन्यांनी त्यांनी विनायकाला विचारलें, राजनिष्ठेची शपथ घ्या, राजद्रोह करणार नाही असें लिहून द्या आणि मग हीं वस्त्रें परिधान करा.

विनायकाने तसें आश्वासन दिलें नाही. त्यानें सांगितलें, हा प्रश्न आपल्या कक्षेंत येतोच कसा? राजद्रोह करीन तर विधि बघून घेईल; आणि पुन्हा हिंदुस्थानच्या नागरिकाने वंदे मातरम् म्हणणें हाहि राजद्रोह होतो. आपलीं वस्त्रें आपल्या जवळच ठेवा.

# १२

अधिकारी म्हणाले –

झालासां उत्तीर्ण परीक्षा। वस्त्रें ही परिधान करा।
करा दूर दारिद्र्य आपदा। संपत्तीने भवन भरा॥ ध्रु० ॥

जाणा या वस्त्रांची महती।
विद्वत्तेचें रूप दाविती।
कवच कुंडलें जण शोभतीं।
रक्षण करिती आयुष्याचें कीर्तीचा हा नित्य झरा।
करा दूर दारिद्र्य आपदा। संपत्तीने भवन भरा॥ १॥

राजनिष्ठ मी वदा मुखाने।
सोडा विध्वंसक अभियानें।
मिरवा पदवी अभिमानाने।
वंद्य मानणें राजाला हा विद्वानांचा पंथ खरा।
करा दूर दारिद्र्य आपदा। संपत्तीने भवन भरा॥ २॥


विनायकाने सांगितलें –

ऐश्वर्याची दास्यामधल्या किंचित अभिलाषा न मला।
देशाचा मी नम्र उपासक पुरे एवढा मान मला॥

# झालासां उत्तीर्ण परीक्षा

विद्वान् आपण विधी जाणतां ।
अधिक्षेप हा कशास करिता ।
अटीस देऊं कशी मान्यता ।
जेत्याला जित वंद्य मानुनी सांगा कोण कधीं नमला ।
देशाचा मी नम्र उपासक पुरे एवढा मान मला ।। ३ ।।

त्यजुनि आपलीं कवच कुंडलें ।
सूर्यसुताने ब्रीद राखलें ।
तत्त्वनिष्ठ ना यमासि हरलें ।
सांभाळा पदवीचीं वस्त्रें, मातें माझा मार्ग भला ।
देशाचा मी नम्र उपासक पुरे एवढा मान मला ।। ४ ।।



कर्झन वायली होता तो. तत्कालीन भारतमंत्र्यांचा जणू नेत्र. हिंदुस्थानांतील स्वतंत्रता-आंदोलन दहशतीने दडपून टाकण्यामागील सूत्रधार.

अनेक देशभक्तांना इंग्रजांनी फाशी दिलें होतें. अनेकांना अंदमानला धाडलें होतें.

मदनलाल धिंग्रा एक देखणा तरुण. अल्लड वय आणि श्रीमंत पित्याने उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला धाडलेला. ऐटींत राहावें, खावें-प्यावें, आमोद-प्रमोद करावा हें त्याचें छानछोकी जीवन.

पण होता राष्ट्रभक्त. क्षणांत छानछोकी फेकून देण्याची सिद्धता असलेला म्हणूनच तो भोगवादी नव्हता. राष्ट्रासाठी प्राण फेकून देणाऱ्या उच्च कोटीच्या राष्ट्रभक्तांत त्याचें आसन होतें. पण तें अद्याप ठरावयाचें होतें.

हिंदुस्थानच्या तरुणांना देशभक्ति काय असते हें शिकविलेंच पाहिजे ही त्याची तळमळ होती. त्याने पिस्तुल घेतलें. संधि साधली. इंपीरियल इन्स्टिटयूटमधील एका मेजवानीचें आमंत्रण मिळवलें, प्रवेश मिळविला; कारण. . . .

कारण कर्झन वायली येथे येणार होता.

# १२

सेतूवरूनि दोराच्या धिंग्रा स्वर्पंथ चालतां ।
मुक्तिचा मार्ग देशाच्या सांगे सूत्रांत भारता ।।
क्रांतिनायक सूत्रें ती करी मुद्रित फैलवी – ।
वृत्तपत्रांतुनी, गीता झाली ती क्रांतिची नवी ।।

सेवेसाठी हिंदुभूमिच्या, करी मृत्युला मी पाचारण ।
पुण्यभूवरी त्याच करो हा पुनरपि आत्मा देहा धारण ।
देशा अर्पण हे आत्मार्पण ।। ध्रु० ।।

मान्य मला. . इंग्रजी सांडलें रक्त मीच त्या दिनीं ।
प्रतिशोधाची संकेतात्मक होती इच्छा मनीं ।
देशभक्त मारले तुम्हीं या बसुनी सत्तासनीं ।
आणि पाशवी बळें धाडले कितीक निष्कासनीं ।
उठलों मी एकटा, स्वयंभू, रंगविलें हें एकाकी रण ।
देशा अर्पण हें आत्मार्पण ।। १ ।।

राष्ट्रा कोण्या सत्ता ठेवी दाबुनि धारेवरी ।
स्वत्वासाठी अविरत राही आयोधन तोवरी ।

त्या संस्थेच्या प्रशालांत म्हणजे हॉलमध्ये मदनलालने कर्झन वायलीवर गोळ्या झाडल्या. चुकून एक गोळी एका पारशी डॉक्टरला लागली. कर्झन वायली मेला आणि तो डॉक्टरहि.

दि. १–७–१९०९ हा तो दिवस होता. मदनलालवर अभियोग चालला आणि दि. १७–७–१९०९ या दिवशीं मदनलालचें बलिदान झालें.

मदनलाल पकडला गेला तेव्हा त्याच्या खिशांत त्याने एक वक्तव्य लिहून ठेवलें होतें तें आरक्षींनी स्वाधीन घेतलें होतें. पण न्यायालयांत तें पुढे आणलें गेलें नाही. 'तें वक्तव्य पुढे आणा' मदनलाल सांगत होता पण त्या बांधलेल्या स्वराची दाद कोण घेणार ? क्रांतिनायक होता विनायक. मदनलालने बलिदान कां केलें तें प्रसिद्ध व्हावयास हवें !

डेली न्यूज या वृत्तपत्राशीं संधान बांधलें. त्या वृत्तपत्राला मदनलालच्या त्या अप्रसिद्ध वक्तव्याची प्रत दिली आणि मदनलाल फाशी जाण्यापूर्वी एक दिवस म्हणजे दि. १६–७–१९०९ या दिवशीं तें प्रसिद्धहि झालें. काय होतें त्या वक्तव्यांत ?

## देशा अर्पण हें आत्मार्पण

**निरस्त्र माझा देश ठेवला, खुलें युद्ध ना करी ।**
**म्हणुनि योजला बेत, पाहुनी अंधारी शर्वरी ।**
**साधाया आघात अचानक, प्रशाल केलें मी समरांगण ।**
**देशा अर्पण हें आत्मार्पण ।। २ ।।**

**हिंदू मी, पुत्र मी भूमिचा, माझी ही भावना ।**
**शत्रूचा आघात भूवरी, ईश्वर अवहेलना ।**
**नच मी धीमान्, जतन करी मी दुबळ्या तैशा तना ।**
**अर्पाया निज रुधिरावांचुनि मजपाशीं तीर्थ ना ।**
**श्रीरामाची, श्रीकृष्णाची पूजा ही, मी धर्मपरायण ।**
**देशा अर्पण हें आत्मार्पण ।। ३ ।।**



**स्वातंत्र्याचें समर अखंडित आव्हानिल शासना ।**
**शिकणें आहे आम्हां, भूपुढे प्राणाचें मोल ना ।**
**वेदीवर मी उभा, धडा तो शिकवायातें जनां ।**
**खोल रुजोनी सुफलित होवो, माझी आराधना ।**
**रक्ताने लिहिल्या पानाचें भूयः भूयः घडो संस्करण ।**
**देशा अर्पण हें आत्मार्पण ।। ४ ।।**

जय मृत्युंजय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वीकार
क्रमांक ४८४९५ दि. १।१०।९१

हिंदुस्थानांत बाबांना जन्मठेप झाली होती. नुकतेंच मदनलाल धिंग्राचें बलिदान झालें होतें. लंडनमधील भारतभवन आतां क्रांतिकार्याला सुरक्षित राहिलें नव्हतें. सहकाऱ्यांची ससेहोलपट चालू होती. विनायकाच्या मनावर ताण आला होता, प्रकृति बिघडली होती.

वायुपालटासाठी विनायक दि. २९-७-१९०९ या दिवशीं लंडनजवळील ब्रायटन या समुद्रतीरावरील नगरांत आला. १०-१२ दिवस तो तेथे होता.

एक सहकारी श्री. निरंजन पाल यांच्यासह तो एका संध्याकाळीं समुद्रतीरावर गेला. समुद्र पाहून विचारांच्या कल्लोळाला वाट मिळाली, ती कविता आहे– सागरास–

# १४

एकमुखाने करुनि हकारा, करीं घेतले व्रत असिधारा,
उल्हासाचा उरांत वारा।
नाव चालली क्रांतिदलाची देशाच्या उद्धारा,
घेऊनि जा दुर्लंघ्य सागरा स्वातंत्र्याच्या द्वारा ।। ध्रु० ।।

परवशतेच्या अंधारांतुनि, भारत-वासी पृष्ठी घेऊनि ।
विश्वासाने त्यां रत्नाकर नेई नौकेमधुनी वाहुनि ।
निश्चल नावाडी नौकेचा,
प्रस्तर हिमनग टाळुनि चुकवुनि, विनवित पारावारा ।
घेऊनि जा दुर्लंघ्य सागरा स्वातंत्र्याच्या द्वारा ।। १ ।।

भार टाकला तव पृष्ठावर, पर्यटनाला आलों भरभर ।
प्रहार केवळ कल्लोळांचे, स्वातंत्र्यांचें कोठे मंदिर ।
नौकानायक झाला शंकित,
म्हणतो, सिंधो, कुठें लपविला उद्दिष्टाचा तारा ।
घेऊनि जा दुर्लंघ्य सागरा स्वातंत्र्याच्या द्वारा ।। २ ।।

समुद्रांत लोटलेलें हें क्रांतीचें तारू पैलतीराला कसें जाईल, हेलकाव्यांनी मध्येच तर तें गचकणार नाही, समुद्रावर आपण विश्वास टाकला, तो विश्वास तो पाळील काय? ... अद्याप स्वातंत्र्याची खूणहि दृष्टिपथांत नाहीं; विनायकाचें मन शंकित झाले.

दुसऱ्या क्षणीं त्याला वाटलें, हा सागर आपल्याकडे बघून हसतो आहे, याच्या मनांत काळें आहे. किंवा कदाचित् आंग्ल भूमीच्या स्वामित्वाचाच याला गर्व झाला आहे. माझ्या मातृभूमीला हा तुच्छ लेखत आहे.

प्रबल सागरालाहि विनायकाने धमकावलें, अगस्ति आठवतो का? ...त्याने तुला पिऊन टाकलें आहे, तो भारतमातेचा पुत्र होता. माझी विनवणी, भारतमातेची हांक, ही दुबळ्याची विनवणी समजू नकोस.

## एकमुखाने करुनि हकारा

**हसूं नको तूं फेनमिषाने, नको भेडसावूं गर्वाने ।**

**फुगला कां रे उन्मादाने, आंग्ल भूमिच्या स्वामित्वाने ।**

**दुबळी नाही भारतमाता,**

**पुत्र अगस्ती मन्मातेचा, प्याला सागर सारा ।**

**घेउनि जा दुर्लंघ्य सागरा स्वातंत्र्याच्या द्वारा ॥ ३ ॥**



जय मृत्युंजय

विनायकचे वडीलबंधु बाबा ( गणेश ) यांना २८-२-१९०९ ला अटक होऊन दिनांक ८-६-१९०९ या दिवशीं जन्मठेप झाली. उच्च न्यायालयांत २१-११-१९०९ या दिवशीं पुनरावेदन फेटाळलें गेलें.

धाकटा बंधु बाळ ( नारायण ) यालाहि अटक झाली होती.

## १५

फुलें वाहिलीं देवाकरिता ।
वंचित राहुनि सुखाते स्वतां ।
लोकहिताचा गंध पसरतां । अमर होय ती वंशलता ।। ध्रु० ।।

देउनिया वात्सल्य साउली
मातेची तूं उणीव भरली ।
पत्र पावलें ! कळला आशय
बंधु तुला गे वंदित सविनय ।
आराध्य जिचें भारतमाता । अमर होय ती वंशलता ।। १ ।।

पुष्पें फुलतीं गळतीं सुकतीं
सर्व न देवालागी जाती ।
गजेन्द्र वाही उत्पल हरिला
आला अमरपणा कमलाला ।
नसे मान भुवनीं त्या परता । अमर होय ती वंशलता ।। २ ।।

यौवनसुमनें सर्व खुडावी
श्रीरामाच्या कामीं यावीं ।
मातृभूमिने प्रसन्न व्हावें
त्या सेवेला मानुनि घ्यावें ।
गोत्राला ये तये धन्यता । अमर होय ती वंशलता ।। ३ ।।

रक्तमांसयुत नश्वर काया
सेवेला देशाच्या द्याया ।

बाबांच्या पत्नीने – सौ. येसू वहिनीने – हें वृत्त विनायकाला पत्राने कळविलें. वहिनीला धीर देण्यासाठी विनायकाने १९०९ च्या डिसेंबरमध्ये सांत्वन लिहिलें. पत्र मिळतांच वहिनीला धीर आला. दिराचें पत्र ती गाऊं लागली –

# अमर होय ती वंशलता

लागो स्पर्धा नवयुवकांची
तीच शाश्वती अमरत्वाची ।
पुत्रांना या पथीं धाडतां । अमर होय ती वंशलता ।। ४ ।।

युवकसुमांच्या गुंफुनि माला
अर्पुनि होतां नवरात्रीला ।
उजाडेल दसरा देशाचा
विजयश्रीचा स्वातंत्र्याचा ।
झाली जरि आर्या विवासिता । अमर होय ती वंशलता ।। ५ ।।

धन्य आपला झाला वंश्
निःसंशय देवाचा अंश् ।
भजला पुष्पांनी श्रीराम्
सर्वस्वाचें देऊनि दाम् ।
या पूजेचें भाग्य लाभतां । अमर होय ती वंशलता ।। ६ ।।



धैर्याची तूं मूर्ती वहिनी
माते ! माझ्या स्फूर्तिची धुनी ।
अग्नीमध्ये अथवा शिशिरीं
अचल तूं ! जसा भूवरी गिरी ।
धीराने संकटी वर्ततां । अमर होय ती वंशलता ।। ७ ।।

इकडे नाशिकला दि. २२-१२-१९०९ या दिवशीं अनंत कान्हेरे याने जिल्हाधिकारी जॅक्सनला गोळ्या घालून मारलें.

अनंत कान्हेरे, कृष्णा कर्वे आणि विनायक देशपांडे या त्रिमूर्तींना ठाणें बंदीगृहांत दि. १९-४-१९१० ला फाशी देण्यांत आलें.

# १६

तडितरूप योद्धा कडाडला झगमगाट झाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। धृ ।।

वाटत होतें नाशिक नगरीं
निर्मल सरिता प्रवाहापरी ।
सत्ता परकी सुखकर पावन
शांत सौम्य जिथले होते जन ।
अस्थिर आवृत शांति असे ती दिसलें देशाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। १ ।।

राज्य इंग्रजी चालवावया
महती परक्यांची पटवाया ।
प्रभागाधिपति होता जॅक्सन
उत्कर्षाचें जणु आश्वासन
स्वत्वाचें सामर्थ्य कथाया तदा इंग्रजाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। २ ।।

म्हणती जॅक्सन होता पंडित
होता संस्कृत भाषामंडित ।
आणि मराठी व्याख्यानांतुन
राज्य करी तो लोकां भुलवुन ।
सर्व न भुलले होते कांही विटले दास्याला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ३ ।।

थोड्या दिवसांपुरता होता
नाशिक नगरीं जॅक्सन आता ।
मानपत्र अन् हारतुऱ्यांची
लागे स्पर्धा पौरजनांची ।

# तडितरूप योद्धा कडाडला

हार एक पेटला शत्रुचा देह दग्ध झाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ४ ।।

किर्लोस्कर संगीत मंडळी
लोकप्रियतेवरी चालली ।
तेथे विजयानंद मंदिरीं
खेळ शारदा संपन्न करी ।
विजयाचा आनंद मिळे त्या दिनीं भारताला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ५ ।।

बघूं शारदा गंधर्वाची
गोडी चाखूं संगीताची ।
अभिलाषा अधिकारी वदतां
नाटय ठाकलें उभें स्वागता ।
सत्य परंतू होतें टपलें तया प्रासण्याला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ६ ।।



आणि निवडला नाटयासाठी
दिवस जयाची रजनी मोठी ।
अभ्यागत आले नि घेतलें
आसन पहिल्या आवलींतलें ।
चिरनिद्रेचा दूत चिकटला तया आसनाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ७ ।।

विधिक्रमाने कोणी बालक
वाढत होता अनंत नामक ।
तेजाचा तो अंश झाकला
मिळूं बघे उडुनि तेजाला ।

बाल वाढला झाकण फुटलें अंश मुक्त झाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ८ ।।

अनंत, कर्वे कृष्ण, विनायक
देशपांडियांचा स्थिर बालक ।
निघती नाटक बघण्या अथवा
युद्धयोग दाखवाया नवा ।
विद्युत्वेगे भिडले जाऊन दुष्ट पाहुण्याला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ९ ।।

अनंत सांभाळी शस्त्राला
नेम साधुनी प्रहार केला ।
पुन्हा पुन्हा तें चाप ओढला
सात छऱ्यांनी जॅक्सन मेला ।
शैलापरि बटुमूर्ति वाढली ! भिडली गगनाला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। १० ।।

भूकंपाविण भूमि शहारे
धक्क्याने इंग्लंड बावरे ।
भारतीय इतिहासामधलें
पान लोहिताने लिहिलेले ।
वाचुनि बघती अन् ओळखती क्रुद्ध भारताला ।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। ११ ।।

त्रैमूर्तींना आरक्षींनी
अन्य जनांच्या सवें घेरुनी ।
कारागारामधे लोटले
छळुनी लोखंडांत बांधले ।

परी वीर ते, वीरपुत्र ते! बधतील कशाला।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। १२ ।।

न्यायाची मग बसली बैठक
अभियोजक सांगती कथानक।
न्यायमूर्ति ? छेः दंडसभापति
त्रैमूर्तीच्या प्राणां हरती।
जीवित राही परी चेतना देश-मोचनाला।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।। १३ ।।

एकोणिसशे दहाची मिती
एकोणिस एप्रिलची होती।
अनंत, कृष्णा आणि विनायक
उत्सुक होण्या स्वर्गारोहक।
ठाणें कारा तीर्थ, स्थानक असे स्वराज्याला।
अनंत जीवन जाळी जाई ज्योति अनंताला ।।१४।।

स्मरतां भावें त्रैमूर्तींना
कधी मृत्युचें भय राहीना।
हौतात्म्याची गातां कवनें
रोम रोम भरतो स्फूर्तीनें।
प्राणपणाने हटवूं आम्हीं परक्यांचा घाला।
अनंत जीवन चाळी जाई ज्योति अनंताला ।। १५ ।।

हुतात्मा अनंत कान्हेरे याचें आख्यान ऐकल्यावर मुलांनी विनायकाचा त्या कथेशीं संबंध विचारला.

# १७

मुलें –

अनंत जीवनकथा चेतवी उत्साहाची ज्योती ।
तात ! आपली कथा परंतू वीर विनायक होती ।
तुटला कां हो धागा? अथवा सांधा दुसरा आला ?
कथा विनायक आला केव्हां कसा मायदेशाला ।। १ ।।

निवेदक –

ध्यान पाहुनी गोष्टीवरती कथावयाला येई भरती ।
नव तरुणांनो ! जाऊं आपण मूळ कथेच्या ओघावरती ।। २ ।।

सूत्र कथेचें नाहीं सुटलें, जरी तुम्हां तें अलग वाटलें ।
नेता जीवनमार्ग चालतां उपाख्यान त्या पथीं उमटलें ।। ३ ।।

ऐका! चंचल अतर्क्य नियती विनायकाच्या कक्षेभंवती ।
आश्वासुनिया अथवा फसवुनि ऊन साउली खेळत होती ।। ४ ।।

हो स्वच्छंदन पळांत बंधन हिसळी घुसळी सारे तनमन ।
अवकाशांतुन सोडी मारुत कधी झुळुक वा कधी प्रभंजन ।। ५ ।।

कधी भाजतें अंग उन्हाने बर्फाच्छादित कधी बंधनें ।
तरी कराने धरलेला ध्वज होता फडकत आवेशाने ।। ६ ।।

वाङ्मय जनजागृतिचें साधन करी विनायक पुस्तकलेखन ।
स्फूर्तिप्रद आख्यानें लिहिलीं इतिहासाला शोधुन शोधुन ।। ७ ।।

वाङ्मय होतें ज्वालाग्राही त्याचें शत्रूला भय राही ।
झालीं मुद्रित हळुच पुस्तकें आणि पसरलीं दिशांत दाही ।। ८ ।।

## ध्यान पाहुनी गोष्टीवरती

गुप्तपणें पुस्तकें निघालीं हिंदुस्थानामध्ये आली।
संस्थेने त्या आधी होतीं चित्ते युवकांचीं नांगरलीं ॥ ९ ॥

बीजापरि तें वाङ्मय भिजलें, रुजलें, स्फूर्तीसवे उगवलें।
वाढत होती देशप्रीती नवतरुणांचें रक्त उसळलें ॥ १० ॥


निर्यातीला युक्ति योजिली पुस्तकांतुनी शस्त्रें गेलीं।
सशस्त्र झाला अभिनव भारत जशीं पिस्तुलें हातीं आलीं ॥ ११ ॥

भारतमाता की जय बोला शस्त्र मिळालें कान्हेरेला।
बार भयानक उडतां त्याशीं सावरकर संबंध जोडला ॥ १२ ॥

भडका झाला जों वैऱ्याचा माग काढला विनायकाचा।
आणि घेरलें रिपुने त्याला अंत कराया आयुष्याचा ॥ १३ ॥

नेलें त्याला नौकेवरती आणायाला पुन्हा भारतीं।
सुटला होता! परी गवसला! देशाची होती कर्मगती ॥ १४ ॥

विनायकाच्यासह कांही क्षण सागरावरी जाऊं आपण।
बघूं तयाची अतर्क्य लीला कसा झुंजला एकाकी रण ॥ १५ ॥



आणि आतां विनायकालाच अटक झाली. पॅरिसहून तो इंग्लंडला आला, व्हिक्टोरिया स्थानकावर दि. १३-३-१९१० या दिवशीं उतरला, तों आरक्षींनी त्याला स्वाधीन घेतलें. हत्येचा पुरस्कार करणें, सहाय्य करणें, राजद्रोह करणें, अशा आरोपांवरून भारत शासनाच्या आदेशाने ही अटक झाली होती.

## १८

शेवटचा हा रामराम्
सन्मित्रांनो घ्या प्रणाम् ।। ध्रु० ।।

भारतभूचे मणी विखुरले सेवेसाठी दीक्षित झाले ।
बंधुत्वाच्या मृदुल रेशमी धाग्याने एकत्र बांधले ।
नेमुनि देई त्यांस विधाता कार्यासाठी भिन्न ठिकाणें ।
कधी कीर्तिच्या लाटांवर वा कधी उदधिच्या उदरीं जाणें ।
जिथे योजना तेथे जाऊं ।
जळत्या अश्मावरती राहूं ।
स्थान आपलें पहिलें घेऊं ।
मला योजलें विधिने काम्, सन्मित्रांनो घ्या प्रणाम् ।। १ ।।

रंगभूमि होई वसुंधरा, भवितव्याचें भव्य कथानक ।
इतिहासाच्या कालपटावर आपण पात्रें करतों नाटक ।
उत्तम आपुलें साध्य गाठतां ।
यशोगर्जना करील जनता ।
भरतवाक्य तें कानीं येतां ।
भेटुनि बोलूं जयजयराम्, सन्मित्रांनो घ्या प्रणाम् ।। २ ।।

अंदमानचा उदास ओढा सामावो माझ्या अस्थींना ।
स्फटिक तारकासखी जान्हवी कवटाळो वा हृदयीं त्यांना ।
चैतन्याने उजळतील त्या बंधमुक्त भारत होतांना ।
सर्वंकष गर्जना जयाची उच्चरवाने दुमदुमतांना ।

आपलें भवितव्य विनायकाने ओळखलें. ज्या मित्रांनी या खडतर कार्यांत जिवांशीं जीव मिळवून साह्य केलें त्या सहकाऱ्यांना त्याने बंदीगृहांतूनच एक संभाव्य अंतिम प्रणाम पाठविला –

## सन्मित्रांनो, घ्या प्रणाम

आक्रमिलेला सागर लंघुनि ।
समंध जाइल तेव्हा परतुनि ।
वैभव भारतभू सांभाळुनि ।
घरा सुखाचें होईल धाम्, सन्मित्रांनो घ्या प्रणाम् ।। ३ ।।

त्याग आपल्या हातामध्ये, फल नियतीची इच्छा राही ।
मार्ग मुक्तिचा भारतभूच्या आत्मत्यागापरता नाही ।
त्या प्रगतीची ठेवा दृष्टि न्यून उरावें त्यांत न कांही ।
राखेमध्ये हौतात्म्याच्या वस्तु वास्तुने पूत धरा ही ।
वास्तूचा त्या निश्चल पाया ।
भारतभूसाठी बांधाया ।
चला पुढे लोहित अर्पाया ।
ईशाचें तें पावन काम्, सन्मित्रांनो घ्या प्रणाम् ।। ४ ।।



जय मृत्युंजय

जॅक्सनहत्या अभियोगांत सावरकरांना गोवण्यासाठी त्यांना हिंदुस्थानांत आणलें जात होतें. त्यांना 'मोरिया' नावेंत दि. १-७-१९१० ला चढविलें. त्यांचा प्रवास चालू झाला. नाव मार्सेलिस बंदरावर आली. एक दिवस थांबली. तें बंदर फ्रान्सचें होते.

दि. ८-७-१९१० हा तो दिवस होता. झुंजूमुंजू होत होतें. खिडकींतून शरीर बळाने घुसवून सावरकरांनी स्वत:ला समुद्रांत झोकून दिलें.

दहा मिनिटांत फ्रान्सचा तट त्यांनी गाठला. ते वर चढले. ५००-५५० यार्ड पळाले. एक फ्रेंच शिपाई त्यांना समोर दिसला. ते त्याच्या स्वाधीन होऊं बघत होते.

# १९

घेतले प्राण हातावरी।
फोडुनी क्रूर कारातरी। फेकला देह मी सागरीं ॥ध्रु०॥

मुक्त मी या क्षणीं
तोडुनी दावणी।
ना क्षिती या पुढे जीव घेवो कुणी।
वाहुनी दैव माथ्यावरी। फेकला देह मी सागरीं ॥ १ ॥

स्वस्थ शत्रू मनीं
रोखुनी संगिनी।
मान फासावया नेतसे बांधुनी।
उर्मि आली जशी अंतरीं। फेकला देह मी सागरीं ॥ २ ॥

मुक्तिचा भक्त मी
कोंडलेला तमीं
नौ-गवाक्षांतुनी जन्मभूतें नमी
छत्र वारी उषा अंबरीं। फेकला देह मी सागरीं ॥ ३ ॥

नष्ट हो दुर्दशा
बंधनाची निशा
भारता भानुचा रश्मि दावो उषा।
अर्घ्य सूर्यासि देण्या करीं। फेकला देह मी सागरीं ॥ ४ ॥

पण त्यांचा पाठलाग होत होता. ब्रिटिश आरक्षींनी त्यांना धरलें. पुन्हा मोरियावर आणलें.

सावरकरांचें स्वकष्टार्जित स्वातंत्र्य क्षणभरच टिकलें. पण त्या क्षणिक स्वतंत्र स्थितीची चेतना आत्म्याप्रमाणेच अमर होती.

पुन्हा बंदींत टाकल्यावर सावरकरांनी स्वतःचें सांत्वन केलें. 'अवध्य मी भला, मारिल रिपु मजसि असा कवण जन्मला'। क्षणभर तर मी स्वतंत्र होतों. बलाढ्य शत्रूला चकविण्यांत मला विजय मिळाला. आता माझ्या या नश्वर देहाचें कांहीहि होवो. माझी चेतना अमर आहे. तीच भारताला स्वातंत्र्य-सूर्य दाखवील !

## फेकला देह मी सागरीं

सिद्ध मी चेतना
तुच्छ मानी तना
वध्य ना छेद्य ना शोष्य ना क्लेद्य ना।
निर्भये वावरे संगरीं। फेकला देह मी सागरीं ।। ५ ।।

मारण्याला मला
शत्रु ना जन्मला
येत जों मारण्या तोंच भांबावला।
दूर जाई भयाने अरी। फेकला देह मी सागरीं ।। ६ ।।

तोफ बंदूक वा
सैनिकांचा थवा
आवती भोवतीं घालुं दे तांडवा।
सत्य मी नित्य मी भूवरी। फेकला देह मी सागरीं ।। ७ ।।



सावरकरांना मोरिया जलयानांतून एडनपर्यंत आणलें. तेथून साष्टी जलयानांतून मुंबईस आणलें. तो दिनांक २२–७–१९१० हा होता. त्यांना लगेच नाशिकला नेलें गेलें. प्राथमिक चौकशी झाली.

जॉन पार्किन्स हा आरक्षी अधिकारी पूर्वी नाशिकला होता. त्याची सावरकरांवर योजना झाली होती. सावरकरांना त्याने नाशिकला पाहिलें होतें. मुंबईस अभियोग चालणार होता. दि. १५-९-१९१० हा दिवस नेमला होता. सावरकरांना प्रथम येरवड्यांत आणि मग मुंबईस डोंगरी येथे आणलें होतें. सावरकरांना न्यायालयांत नेलें

# २०

विधिज्ञांनी पहा राव येथे कमावलें नांव
न्याय-अन्यायाची फोड केली आम्हांसी अतोड ।
लढविले बुद्धिवाद उंच बांधले प्रासाद
विद्वत्तेचें तुम्हां लेणें सोडा रक्तांत खेळणें ।
जॉन्स पार्किन्स पामर सांगतसे सुविचार
तुम्ही ज्ञानाचें भांडार करा बुद्धीचा व्यापार ।

देवदानवांचें रण न्यायान्यायाचें कारण
दैत्यगुरु शुक्रामनी विद्या होती संजीवनी ।
देवपुत्र कच गेला संजीवनी शिकण्याला
गेला शत्रूच्या गोटांत शिरे शुक्राच्या पोटांत ।
मंत्र केला नामशेष त्यास पावे परमेश
होतां दुर्बळ असुर झाले जयी सुरवर ।
विनायक चिंती मनीं जाय मंत्र सहा कानीं
गेली गुप्तता लयाला इंग्रजांचा भाव गेला ।
फोडलें मी रिपुद्वार दैत्यविद्येचें कोठार
सुखेनैव करा वार नाशवंत हें शरीर ।

म्हणे पार्किन्सा पामरा थोर अज्ञानी तूं खरा
अज्ञ लोकांचें भारतीं घेतलें मी कार्य हातीं ।


जात होतें. समुद्रतीरावर उभ्या असलेल्या एका वास्तूकडे निर्देश करून पार्किन्स म्हणाला, " ती पहा एका बॅरिस्टरची वास्तू. नुकतीच बांधली ती त्याने. तुलाहि असे प्रासाद उठवतां येतील. विधिज्ञ झाला आहेस. लोकांचीं कामें घे. धन मिळव. क्रांतिकार्य सोड. "

पार्किन्सच्या सांगण्यांत सहानुभूति असेलहि. पण सावरकरांनी सांगितलें, " मी माझ्या देशाचें काम चालवितों आहें. देशाच्या स्वातंत्र्याची वास्तु मी घडवीत आहें. "

## सोडा रक्तांत खेळणें

काम तेंची लढवितां शुल्क बेडी येई हातां
मातृमूर्ती देशांतली तुम्ही रक्ताने माखली ।
धूत मी तें रक्त सारें शुद्ध करीतों मंदिरें ।

भव्य सौधासाठी नाहीं मिळविली मी विद्या ही
उंच पताकेचा मान राखण्याला माझें ज्ञान ।
करूं देहाची कां चिंता कृष्ण भारताचा त्राता
देवकार्याचा विस्तार हाच माझा अलंकार ।



एकूण ३५ जणांवर राजाविरुद्ध युद्ध करण्याचा कट केल्याचा आरोप होता. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ति श्री. सर बेसिल स्कॉट, श्री. नारायणराव चंदावरकर, आणि श्री. हॉटन यांच्या विशेष न्यायालयापुढे १५-९-१९१० ला सुनावणी चालू झाली होती.

दि. २४-१२-१९१० ला निर्णय लागला. आठ आरोपी निर्दोष सुटले. सावरकरांना जन्मठेप झाली. इतरांना ६ महिने ते १५ वर्षेपर्यंतच्या शिक्षा झाल्या. श्री. नारायणराव सावरकर ( बाळ ) यांना सहा महिने शिक्षा झाली.

जॅक्सनच्या हत्येंत हात असल्याच्या आरोपावरून सावरकरांवर दुसरा अभियोग चालू होता. दि. ३०-१-१९११ ला त्यांत सावरकरांना जन्मठेप झाली. दोन्ही शिक्षा एकामागोमाग भोगावयाच्या !

# २१

शरसंधाने लंडनच्या नाशिक तूं केलें विद्ध ।
सार्वभौम नृपति विरुद्ध मांडलेंस युद्ध निषिद्ध ।
आरोप तुझ्यावर दोन्ही सप्रमाण झाले सिद्ध ।
आसन अन्यायाचें तें ।
सत्तान्ध इंग्रज होते ।
भय चैतन्याचें त्यातें ।
बोलले भयानक वाणी दोन जन्म काळें पाणी ।। १ ।।

शब्दार्थाने जन्मान्तीं शिक्षा दुसऱ्या जन्माची ।
परि दया दंडिता द्यावी कनवाळू सम्राटाची ।
पन्नास पूर्ण वर्षांनीं मुक्तता करावी याची ।
ऐकूनि शब्दच्छल असला ।
उपहासें दण्डित हसला ।
त्या दर्प मदाचा दिसला ।
वदला, कां भोगत कोणी ? दोन जन्म काळें पाणी ।। २ ।।

सांगतसे, शास्त्यांपेक्षा कलिकाळ दयाळू राही ।
धुडकावुनि राजाज्ञेतें मुक्तता करी लवलाही ।
अडविण्या धर्मराजाला सामर्थ्य आपलें नाही ।

कोणी अधिकारी म्हणाले, "म्हणजे तुम्ही दुसरी शिक्षा दुसरा जन्म घेऊन भोगावयाची ! " उत्तर आलें, " आपण ख्रिश्चन ! पुनर्जन्म मानीत नाही! माझ्या शिक्षेच्या कार्यवहनासाठी कां होईना, बायबल खोटें पाडलेंत ! पुनर्जन्म मानलात !"

कोणी म्हणाले, "शासन दयाळू आहे ! पन्नास वर्षांनी तुमची मुक्तता करील !" सावरकर म्हणाले, "मृत्यू त्यापेक्षा दयाळू आहे. तो आधीच माझी मुक्तता करील !"

पण सावरकरांची धारणा होती, शासनाने इतकीं वर्षे उच्चारलीं आहेत खरीं ! त्यांचें राज्य निदान इतकीं वर्षे टिकणार आहे अशी त्यांना घमेंड दिसते ! ते अधिकाऱ्यांना म्हणाले, " आपलें राज्य टिकणार आहे का तोंवर ? मी माझी शिक्षा भोगीन. हालअपेष्टा सहन करीन. त्यांतूनच माझी मातृभूमि मुक्त होणार आहे. तुम्ही मात्र भिंतीवरील लेखावरून काळाचीं पावलें ओळखा ! "

## दोन जन्म काळेंपाणी

न्याय हा अलौकिक झाला।
लाजला काळ राजाला।
ऋण माझें चुकवायाला।
मृत्योत्तर देणीं घेणीं    दोन जन्म काळे पाणी ।। ३ ।।

सांगतां बायबल सूत्र    मानव जर कोणी मेला।
मुक्तिदिनासाठी थांबे    पाप पुण्य ऐकायाला।
तोंवरी गाडला राही    जन्म दुजा नाहीं त्याला।
मृत्यूनंतर जन्माची।
धारणा हिंदुधर्माची।
संसृति ही चालायाची।
सूत्राला तुमच्या हाणी    दोन जन्म काळें पाणी ।। ४ ।।



इथुनी वर्षे पन्नास    राहील राज्य हें काय ? ।
वाटत का शिक्षेने या    शौर्यहीन होइल माय ? ।
धक्क्या मागुन धक्क्यांनी    तुम्हि घ्याल काढता पाय।
भिंतीवरच्या लेखाने।
समजावें साम्राज्याने।
वागवीन आनंदाने।
बड्यांचीं तोंवरि लेणीं    दोन जन्म काळें पाणी ।। ५ ।।

जय मृत्युंजय

काथ्याकूट ! सडलेले दोर पुन्हा कुटायचे, तंतु अलग करायचे अन् पुन्हा वळून त्याचे नवीन दोर करायचे ! सृष्टीच्या क्रमाची एक प्रतिकृतीच ( मॉडेल ) ती ! सडलेलें जीवन पंचत्वांत जायचें, त्या पंचत्वांतून जीवतंतु बनायचे, काळाने आयुष्य हा दोरखंड वळायचा, तो सडला की पुन: मोगरीने घाव घालून त्याचे तंतु पंचत्वांत विलीन करायचे !

काथ्याकुटींतून सावरकरांना जीवनाचें तत्त्वज्ञान सुचलें. काथ्या कुटण्याचा पहिला प्रसंग डोंगरीच्या कारागृहांत १९११ मध्ये आला.

# २२

दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ।
धरा मृत्युने जसे कुटावे तंतु जीवनाचे ।। ध्रु० ।।

जुटला बंद्यांचा संघात्
ठेका धरुनी चाले हात्
आघातावरती आघात्
पिंजुनि बनतां सळ, आवळती दोर त्या सळाचे ।
दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ।। १ ।।

दिनभर चाले काथ्याकूट्
पुरी भरे तंतूंची फूट्
तेव्हा शिक्षेमधुनी सूट्
अमिष तेवढें पुरतें वाटे दंडिता फळाचें ।
दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ।। २ ।।

सडके तुटके फुटके दोर्
नवे व्हावया पुन्हा समोर्
पुन्हा साहती घाव कठोर्
येई नवता, तंतू वळतां तेज ये बळाचें ।
दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ।। ३ ।।

# दगड मोगरीमधे सापडे

पंचमहाभूतांची खाण्
जीवतंतु करते निर्माण्
विणते आयुष्याचा ताण्
सडे ताण अन् करी वेगळे मृत्यु तंतु त्याचे।
दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ॥ ४ ॥

विलीन होतां पंचत्वांत्
तंतू पुन्हा रूप घेतात्
नियतीचा जें फिरतां हात्
आयुष्याची वटी बने तें जिणें मानवाचें।
दगड मोगरीमधे सापडे सोड नारळाचे ॥ ५ ॥



सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा लागली होती. डोंगरी बंदीगृहांत त्यांना ठेवलें होतें. थोड्या दिवसांनी त्यांची अंदमानला पाठवणी होणार होती. ती पाठवणी जून १९११ च्या शेवटीं शेवटीं झाली.

वर्ष १९११ च्या प्रारंभींच्या महिन्यांत सौ. यमुनाबाई ( माई ) सावरकरांना भेटल्या. सौ. माईसह त्यांचे बंधु आले होते.

पतिपत्नींची भेट झाली.

भेटून आल्यावर घरच्या मंडळींनी विचारलें, " काय म्हणाले तात्या ? "

तात्यांचे शब्द माई सांगूं लागल्या :

# २३

घरट्याच्या परिसरांत सीमित पक्ष्यांचा संसार ।
करूं पाहतो पुरुष महत्तम विश्वाचा व्यापार ।
तेंचि हो संसाराचें सार ।। ध्रु० ।।

आपत्ति नसे ही अपघाती ।
चूल बोळकीं अपुल्या हातीं ।
फोडुनि, त्यांची केली माती ।
विशाल होतें लक्ष्य, वाहिलें अग्नीला घरदार ।
तेंचि हो संसाराचें सार ।। १ ।।

शोक सहचरी तूं न करावा ।
मनीं एक विश्वास धरावा ।
राष्ट्रोद्धारा होम हा नवा ।
तिळतिळ जळतां आयुष्य, जरी झाले कष्ट अपार ।
तेंचि हो संसाराचें सार ।। २ ।।

# तेंचि हो संसाराचें सार

यज्ञांतुनि या अमृत लाभतां ।
भूमीला मिळतां स्वतंत्रता ।
होतां येथे दृढ मानवता ।
घराघरावरि चढेल सुंदर सोन्याचें कौलार ।
तेंचि हो संसाराचें सार ।। ३ ।।

कृतार्थ हो संसार आपला ।
गेहसुखाचा मोह न धरला ।
ध्येयास्तव साही विरहाला ।
विश्वाचा संसार कराया होतों सीमापार ।
तेंचि हो संसाराचें सार ।। ४ ।।



जय मृत्युंजय

जून १९११ च्या शेवटीं शेवटीं मुंबई-मद्रास आगगाडीच्या एका डब्यांत सावरकरांना कोंडून टाकलें. गाडी भरधांव सुटली. त्यांना अंदमानला पोचविण्यासाठी ती आतुर होती. जबडयांत सावज धरून धांवत सुटलेली, पिसाळलेली वाघीणच जणू !

" मला ही गाडी अशाच वेगाने स्वदेशाला आणील का ? का मी अंदमानांतच 'हाय भारत !' 'हाय हिंदुस्थान! ' करीत मरणार ? " सावरकरांच्या मनांत विचार आला –

# २४ त्या डब्यांत होती मृत्यूची छाया

त्या डब्यांत मृत्यूची होती छाया उसाळली ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। ध्रु० ।।

गावांमागुनि गांवें ।
टाकुनि मागे धावे ।
कुठुनी मज ना ठावे ।
वनें उपवनें, पर्वत, ओढे लंघून चालली ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। १ ।।

पाश मागचे तोडी ।
क्षणाक्षणाला ओढी ।
श्वास भयानक सोडी ।
धाप लागतां अधुनी मधुनी गुरगुरत थांबली ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। २ ।।



मजसम भारतवासी ।
करण्याला वनवासी ।
आंग्ल भूमिची दासी ।
टपुनी होती, सावज मिळतां धरण्या उफाळली ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। ३ ।।

घाली मजवरि घाला ।
वेग वायुचा आला ।
विपिनीं सोडायाला ।
आणिल का ही परत मला, कीं रक्ता चटावली ? ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। ४ ।।

कशास आशा वेडी ।
अंगावरची बेडी ।
मसणवटीची गाडी ।
हाय मातृभू ! करित कदाचित होइन हिचा बळी ।
मानगुटीला धरुनि धांवते वाघिण पिसाळली ।। ५ ।।

'महाराजा' जलयान मद्रास तीर सोडून निघालें १-७-१९११ ला. त्यांत बंद्यांचे चलान होते. ४-७-१९११ ला अंदमान आलें. पोर्ट ब्लेअर या ठिकाणीं चलान उतरवले. तें 'सेल्यूलर जेल' मध्ये गेले.

त्या चलानांत सावरकरांची पाठवणी झाली होती.

# २५ अंदमानला निघे चलान्


बंद्यांनीं भरलें जलयान् ।
अंदमानला निघे चलान् ।। ध्रु० ।।

क्रोधी कोणी म्हणुनि विधीचा बंदी झाला ।
कुणी उपाशी कुणी अधाशी म्हणुनी आला ।
कोणी आला मुक्तिदेवता पूजायाला ।
सर्वांसाठी एकचि यान् ।
अंदमानला निघे चलान् ।। १ ।।

भिडे येउनी दंडाबेडी हातकडीला ।
नेढ्या नेढ्यांतून ओवती लोहशृंखला ।
जोडी जोडी गुंफुनि केली मानवमाला ।
नमला नियतीला बलवान् ।
अंदमानला निघे चलान् ।। २ ।।

यान शक्तिने जलराशींना कापत होतें ।
तोडत होतें बंद्याच्या प्रिय संबंधातें ।
भवितव्याशीं गतकालाचें जोडत नातें ।
परतीरीं नौकेचे ध्यान्
अंदमानला निघे चलान् ।। ३ ।।

मुखामुखावर शून्य भाव फैलावत होता ।
वारा खारा फुप्फुसांत घोंगावत होता ।
सुस्कारा थरकत्या हृदांचा शोषत होता ।
जिवंतपणिचें जणू स्मशान् ।
अंदमानला निघे चलान् ।। ४ ।।



आणि विनायक निरखत होता भवितव्याला ।
पदक उरींचें दाबत होतें वरुनि उराला ।
उत्सुक होता परी पाहण्या नवदेशाला ।
अवनीचें उघडे अपिधान् ।
अंदमानला निघे चलान् ।। ५ ।।

(अपिधान = झाकण)

सावरकरांचें चलान निघालें आणि ४-७-१९११ ला अंदमानला पोचलें. बाबा आधीच काळेपाण्यावर गेलेले होते, पण तात्यापासून दूर! नैसर्गिक कोंदणांतले दोन डोळे कधी भेटूं नयेत तसे कृत्रिम कोंदणांतले हे दोन नेत्र एकमेकांपासून दूर होते. पण ऑगस्ट १९११ मध्ये बाबा आणि तात्या यांची चोरटी भेट झाली.

## २६

बाबा पाही समोर अनुज लोहबद्ध जसा।
धक्क होय हृदय! पुसे, तात्या तूं इथे कसा? ।। ध्रु० ।।

अंदमानच्या वनांत
बंधु बंधु भेटतात।
तात्याचा दुःखभार
बाबाला होत फार ।
स्वेदानें चिंब काय तृष्णेनें शुष्क घसा ।
धक्क होय हृदय! पुसे, तात्या तूं इथे कसा? ।। १ ।।

कायेचा तूं कोमल
नव-दीक्षित उच्छृंखल।
सोन्याचें तुज यौवन
पाहिलें न तूं जीवन।
तूं इकडे आणि दूर भार्या तव मदालसा।
धक्क होय हृदय! पुसे, तात्या तूं इथे कसा? ।। २ ।।

क्रांतीचा तूं गायक
स्वातंत्र्याचा नायक।
होतिल अनुचर हतबल
पाहुनिया तुजसि विकल।
खेळला कसा न कळे दैवाने खेळ असा।
धक्क होय हृदय! पुसे, तात्या तूं इथे कसा? ।। ३ ।।

बाबांनी आपल्या भावना चार शब्दांत व्यक्त केल्या. "तात्या! तूं इथे कसा?" त्या शब्दामागे भरलेला अर्थ दुसरा कुठला असणार !

## तात्या तूं इथे कसा ?

कोण ही ध्वजा धरील
देशकार्य सावरील !
झाकाळे धाराधर
मिहिराला खाय तिमिर ।
वाट बघे सूर्याची खिन्नपणें आज रसा ।
धक्क होय हृदय ! पुसे, तात्या तूं इथे कसा ? ॥ ४ ॥

आम्ही पाइक तत्पर
लढविण्यासि हें संगर ।
सेनानी बद्ध ! हाय !
काय त्यावरी उपाय ।
दुःखानें, क्रोधानें रडतें मन ढसा ढसा ।
धक्क होय हृदय ! पुसे, तात्या तूं इथे कसा ? ॥ ५ ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...२४४९५... वि. ...काव्य...
...१९९... ...११।३।७९
१०५८३

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा दिनांक ४-७-१९११ ते मे १९२१ हा जवळ जवळ दहा वर्षांचा काळ अंदमानांत गेला. आधीपासून थोडे थोडे राजबंदी येऊं लागले होते. मग ते पुष्कळ प्रमाणांत येऊं लागले.

दंडेली, अत्याचार, पठाणी खाक्या अशी वागणूक बघून सावरकरांनी राजवंद्यांच्या सहाय्याने त्या दंडेलीला धक्के देण्यास आरंभ केला. बाबा ( गणेशपंत ) आघाडीवर असत.

शुद्धि हें एक आवश्यक कार्य सावरकरांनी हातीं घेतलें. कारण बाटवाबाटवीचा फार सुळसुळाट झाला होता. बंदीगृहाबाहेर मुक्त बंद्यांच्या वसाहती होत होत्या.

# २७

अनभिषिक्त नृप अंदमानचा मार्ग दावी दल चाले ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। ध्रु० ।।

अंदमानचा कारावास् ।
एकलकोंडीमधे निवास् ।
कदन्न, कोंडा त्याचा घास् ।
परंतु राही बुद्धि विचक्षण मनश्चक्षु भंवती हाले ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। १ ।।

घाम गाळतो निढळाचा ।
फिरवी घाणा तेलाचा ।
बैलांनीं फिरवायाचा ।
केले गोळा घाण्यामधले समधर्मांचे मतवाले ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। २ ।।

राज्य पठाणी जणु होतें ।
भिंतीच्या आधारातें ।
धर्मांतर लादायातें ।
हिंदु नृपाच्या परंतु वाचे दीनांनाही बळ आलें ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। ३ ।।

तेथेहि शुद्धीचें कार्य पोचविलें. होतां होतां त्या बेटावरील बाटवाबाटवीला आळा बसला.

साक्षरतेचें कार्य सावरकरांचें दुसरें उल्लेखनीय कार्य. त्यांनी हिंदीचीच शिक्षापद्धति चालू केली. सर्वदूर हिंदीचें शिक्षण वाढू लागलें.

या सर्व कार्याचा परिणाम म्हणजे अंदमानांत मुसलमान बहुसंख्य होऊं शकले नाहीत. नाही तर फाळणीच्या वेळीं पाकिस्तानने तेथे अधिकार सांगितला असता.

सावरकर अंदमानचे अनभिषिक्त नृपति म्हणूनच जणू मानले जात. त्यांच्या कार्याचा त्रोटक आढावा या पद्यांत आहे.

## अंदमानचा अनभिषिक्त नृप

अन्यायाच्या निवारणीं ।
विषम शक्तिच्या उभ्या रणीं ।
संपाची हो उभारणी ।
शिर फुटलें परि भिंतहि फुटली रक्ताला त्या फळ आलें ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। ४ ।।

साक्षरतेचे दिले धडे ।
हिंदीचें प्रांगण उघडे ।
शुद्धीची वहिवाट पडे ।
झाले भारत-भाग बेट ते भारतभूकी जय बोले ।
हिंदु राहिला हिंदू म्हणुनी तिथे भारतध्वज डोले ।। ५ ।।



अभिनव भारताच्या क्रांतिकार्यांत अहमहमिकेने सहभागी असणारी गणेशपंतांची – बाबांची पत्नी येसूबाई, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जिचा उल्लेख धैर्यमूर्ति, माझे स्फूर्ति, असा केला ती येसूवहिनी, जनतेकडून उपेक्षा, शासनाकडून छळ सहन करीत करीत एकाकी जीवन जगत होती. बाबांची निदान भेट होईल अशी आशा तिने वर्षानुवर्षे धरली होती. एप्रिल १९१९ मध्ये ती निवर्तली आणि नंतर पतीच्या भेटीची अनुज्ञा हातीं आली !

## २८

येसूबाई एक उपेक्षित जाय आजला पंचत्वाला ।
क्षणभर थांबा क्रांतिसतीला दोन आंसवें ढाळायाला ।

कुणी पाहिल्या स्वातंत्र्याच्या पायामधल्या शिला ?
तुमचे आम्हां कळस खरोखर त्यांवरि आधारिला ।।

अभिनव भारत असिधाराव्रत । येसूबाई धरि अव्याहत ।
बाबांची ती सोज्वळ दारा । स्वतंत्र असुनी भोगत कारा ।।
बाळ नि तात्या दीरांवर ती । माया ओती आईपरती ।
सदैव झगडे दारिद्र्याशीं । अर्धभुक्त वा कधीं उपाशी ।।
चिंता करतां एकदा पती । विनायकाच्या शुल्कावरती ।
येसू वहिनी देई अपुला । अलंकार मोडण्या पतीला ।
बहुमोलाचें आभूषण तें । परंपरेने आलें होतें ।
प्रेम त्याहुनी प्रिय वहिनीला । दीराचे, घर भूषविण्याला ।।
म्हणे शिक्षणीं दीर असावा । अग्रेसर, तो घरा विसावा
सुवर्ण-भूषण शोभेहुनिही । अलंकार तो उज्वल राही ।।
साथीमध्ये जें बाळाला । होता ग्रंथिज्वर झालेला ।
रात्रंदिन कष्टली माउली । घालविली मृत्यूची साउली ।।

त्या दिवसांहुनि अवघड आता । परिस्थितीचा फेरा होता ।
अंदमानला बाबा गेले । तात्याला त्या मागुति नेलें ।।
बाळहि गेला कारागारीं । कोण सतीचें दुःख निवारी ।
म्हणती जन ही दाहक नारी उभे करीना कोणी दारी ।।

# येसूवहिनी

कोणी जेव्हा आश्रय देती । आरक्षी पिच्छा पुरवीती ।
पायतळीची भूमि सरावी । आणि निर्धरा साध्वी व्हावी ।।
घ्यावा आश्रय काष्ठपटाचा । तवा तापला व्हावा त्याचा ।
जलांत जों प्रस्तर शोधावा । कासवापरी खडक बुडावा ।।
अंशुक जाडें भरडें ल्यावे । नियतीने तें हिसकावावें ।
अन्नाची जों चव चाखावी । मुखांत केवळ माती यावी ।।
देशभक्ति हा प्रमाद राही । तेव्हा पतिच्या संगे तीही ।
आर्या होत्या जिवंत जळत्या । उपमा नाही त्यागाला त्या ।
मिळे न आम्हां अवसर पळभर दोन आंसवें ढाळायाला ।।

एके दिवशीं देव दयाळू करी कृपा तीवरी
उद्घोषाविण देवलसी ती हौतात्म्यातें वरी ।

सावरकर कुलवधू अशी ती । अलिखित कारा भोगत होती ।
वनवास असा दमयंतीचा । कुठवर सांगा चालायाचा ।।
छळ छळकाचा मन साहीना । कुणा कथाव्या तिने वेदना ।
प्रसन्न ठेवी मुद्रा वरुनी । विरहें जाई मन पोखरुनी ।।
केल्या होत्या किती खटपटी । भ्रतार भेटावा यासाठी ।
वर्षोवर्षें करी प्रतीक्षा । देशभक्तिची जणुं ती शिक्षा ।।
शिक्षा त्यांची काय भयंकर ! छाया मृत्यची शय्येवर ।
उजाडता अंधार दिसावा । अंधारींही कोठचा दिवा ।।
जीवन जळतें विरहाग्नीवर । मातृभूमिच्या पुण्य पदावर ।
एवढाच कां सुत हो तिजला । ऋण जन्माचें फेडायाला ।।



जय मृत्युंजय

पूजा करतांना रातंदिन । पतिचें यावें मनांत चिंतन ।
बोले तुळसीला नवसातें । चुडा तुला गे वाहिन माते ।।
मातें माझा मिळावा पती । होइन तेव्हा सौभाग्यवती ।
वागवीन तें ऋण आजीवन । वाहिन देशासाठी नंदन ।।
शब्द नसे तें पुस्तक नाही । बुद्धि नसे तें मस्तक नाही ।
पृष्ठीं भाता बाणावांचुन । भारभूत हो जगण्या जीवन ।।
विनती माझी ऐक भवानी । दुःखित विरही मी सुवासिनी ।

ना तरि हें आभूषण पोकळ । येवो माझ्या पूजेला फळ ।।
काळ लोटला द्रवलें शासन । भेटीचें दिधलें आश्वासन ।
लिहिलें, जावें अंदमानला । पतिला अपुल्या भेटायाला ।।
परंतु काया थकली होती । गात्रें सगळीं सुकलीं होतीं ।
डोईजड दुःखाचा ताता । काळ कधीचा द्रवला होता ।।
संदेशाचा वाहक आला । "येसूबाई" पुसता झाला ।
तया दीर सामोरा जाई । संदेशातें ऐकुनि घेई ।।
थट्टा भीषण झाली होती । दया नृपाची थिजली होती ।
वरात गेली घोडा आला । बैल पळाला झोपा केला ।।
म्हणे दीर संदेशवाहका । दया आपली वापरूं नका ।
कथा नृपाला कळला आशय । विलंब केला मात्र महाशय ।।
दैववशात् जो नृपा लाभला । हट्टाने जो दाबुनि धरला ।
तो पवित्र अधिकार आपला । आहे मृत्यने हिरावला ।
श्रेष्ठ असे यम ! आपण नाही । व्रणितांची तो चिंता वाही ।
केली थट्टा अधिकाराची । आपण मागा क्षमा सतीची ।।

कणाकणाने जीवन जळलें । पान वाळलें भूवरि गळलें ।
चिता पेटली जळली काया । उरली स्मृतिची केवळ छाया ।।
इतिहासाच्या पानावरती । या नारींचीं नांवें नुरती ।
परंतु पानें सुटतिल सारीं । धागे तुटले गुप्त हे जरी ।।

भेटीसाठी अंदमानला । नेई नारायण माईला ।
पाहुनि जाया वहिनीवांचुन । विनायकाचें व्याकुळ हो मन ।।
कळलें वहिनी भूवरि नाही । इतिहासाच्या उदरीं जाई ।
वाण वाटली कलिकाळाला । ग्रंथ दिव्य तो बांधायाला ।।
स्फूर्तीची देवता हरपली । दुःखावेगें भेट करपली ।
विनायकाच्या अश्रू नयनीं । येसूवहिनी ! येसूवहिनी ! ! ।।

थांबूं येथे तिच्या स्मृतीला दोन आंसवें ढाळायाला ।।

सावरकरांची प्रतिभा शब्दाकार घेऊं लागली अंदमानांतील काळकोठडीच्या भिंतीवर! काट्याच्या साहाय्याने भिंतीवर शब्द कोरून लिहावयाचे! असंख्य पंक्ती त्या भिंतीवर लिहिल्या गेल्या. पृथ्वीचाच काय सर्व विश्वाचा प्रवास झाला.

सहवासाने त्या भिंतींनाच अभिनिवेश आला. त्या गाऊं लागल्या –

# २९

सांगती कौतुकें अंदमानच्या भिंती।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ध्रु० ।।

वेटांत कुणीसा जगप्रवासी आला।
भिंतीमधलें तो स्थान शोधता झाला।
आनंदाने त्या देती आतिथ्याला।
त्या यात्रीसह त्या पर्यटनाला जाती।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। १ ।।

राहिले जखडले अवयव लोखंडांत।
लेखनासि नव्हतें साधन कांही प्राप्त।
ज्योती हृदयाची तेवत अंधारांत।
संवाद करी तो भिंतीशीं एकांतीं।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। २ ।।

मन पर्यटकाचें रूप घेत पक्ष्याचें।
यंत्राविण रात्रीं यान बने कक्षाचे।
तो घडवी त्यांना दर्शन अवकाशाचें।
भिंती काळासह ताल धरोनी गाती।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ३ ।।

वातायन होतें मार्ग दाखवायातें।
कालाचा कंटक यात्रा नोंदायातें।
यानांग निरक्षर अलिखित कोरें होतें।
नोंदल्या प्रवासा भिंती गोंदुनि घेती।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ४ ।।

बांधूनि शिदोरी वाक् प्रतिभेची पाठीं।
यात्री सरसावे सूर्यदर्शनासाठी।
घेऊनि परतला सप्तर्षींच्या गाठीं।


# कविता खेळत होती

पाहिल्या पेटत्या नक्षत्राच्या वाती ।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ५ ।।

दिसली त्या सुंदर ठायीं ठायीं रानें ।
जगताचा नायक होता जात रथाने ।
विरह्रोच्छ्वासाच्या भरलें यान धुराने ।
शोधू न सांपडे परी मृत्युची भीती ।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ६ ।।

गुरु गोविंदाला बंदा वैराग्याला ।
श्री शिवरायाला चितोडच्या राण्याला ।
पेशवे कुळाला त्यांच्या पराक्रमाला ।
वाटेंत विखुरले कितीक माणिक मोती ।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ७ ।।

गोमांतक फुललें कमला घे जन्माला ।
आकांक्षा भिडली गरुडापरि गगनाला ।
प्रतिभा-मखराने सजली बंधनशाला ।
चमकते आजला यानाची त्या माती ।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ८ ।।



काजळ पर्वतसम सागरांत भिजवीलें ।
थोरू कल्पतरू पत्र महीचें केलें ।
नित लेखनकार्यी शारदेसि बसवीलें ।
ना तरी श्रेष्ठता भित्तिपटाला येती ।
अंगांत एकदा कविता खेळत होती ।। ९ ।।

सावरकर बंधु अंदमानच्या बंदीगृहांतून बाहेर आणले जात होते. एका बंदी अधिकाऱ्यांने तेवढ्यांत एक साहस केलें. चाफ्याच्या फुलांची माळ त्याने त्यांना घातली. पाया पडला. तो निरोप होता. सत्कार होता. तें अभिनंदन होतें !

त्या बंद्याला – दादूला – भावी संकटाची जाणीव होती. त्याला मारहाण झालीहि. पण तें त्याच्या खिसगणतींत नव्हतें. सावरकर म्हणालेहि, "अरे कशाला हें साहस केलेस ! "

बंद्याने माळ घालण्याच्या त्या कृतींतून व्यक्त केलेल्या निःशब्द भावना शब्दांकित करावयाच्या झाल्या तर यापेक्षा वेगळ्या असणार नाहीत –

## ३०

एक बंदी, चरण वंदी, भेटुनी देत आलिंगनाला
आपणाला, तो म्हणाला, " अर्पितों चंपक-श्वेत माला " ।

सावरकर –

कशास तरुणा साहस केलें घालुनि ही माला ।
आग भयानक वेढुनि राही माझ्या नांवाला ।
जीभ पोळते उच्चाराने ! ज्वाला अंगाला ।
भस्म होत घरदार तयाचे जवळी जो आला ।
दंडधारी, दंडितारी, कृत्य सांगेल हे बंदिपाला ।
एक बंदी चरण वंदी भेटुनी देत आलिंगनाला ।। १ ।।

बंदी दादू –

बाबूजी । विधिपंडित आपण! मी तर मंदमती ।
जीभ अवघडे द्याया उत्तर विद्वानापुढती ।
घेते गोमय कण मातीचे पडतां भूवरती ।
थोडें कळतें मला सुजन कां देशास्तव मरती ।
बद्ध माता, गीत गातां ऐकुनी दुःख वाटे मनाला ।
एक बंदी चरण वंदी भेटुनी देत आलिंगनाला ।। २ ।।

# चाफ्याचें फूल

देवासाठी निजयज्ञाचा मान मिळे कमला।
आपणांत कमलाचें दिसलें मानवरूप मला।
पद्मा त्या पूजाया चंपक योग्य मला गमला।
चाफा समजो मला माय जो चरणांवर पडला।
गंध आला जीवनाला, भीत मी ना मुळी ताडनाला।
एक बंदी, चरण वंदी, भेटुनी देत आलिंगनाला ॥ ३ ॥

स्वातंत्र्याच्या मार्गस्थांच्या पायतळीं पडणें।
चुरगळणें, संपणें, तयाने वाटे धन्य जिणें।
यथाशक्य देणें अन्नोदक, वारकरी भजणें।
यांतचि पंढरपूर आमचें, होई पुण्य दुणें।
वाट चाला, समय झाला! जा सुखाने प्रभो भारताला।
एक बंदी चरण वंदी, भेटुनी देत आलिंगनाला ॥ ४ ॥



वर्ष १९२१ च्या मेमध्ये सावरकर बंधूंना – गणेशपंत आणि विनायकराव यांना – अंदमानांतून हिंदुस्थानांत आणलें. दहा-अकरा वर्षे सावरकरांना छळून अंदमानच जणू दमून गेले होते ! त्यागाचें तेज मुद्रेवर खेळवत सावरकरबंधु हिंदुस्थानांत आले. पण अद्याप देवपण यायचें होतें. लोखंडाचे चणे चावणें उरलें होतें. शेवटीं हिंदुस्थानांतील बंदीगृहांतूनहि त्यांची दोन वर्षांनी सुटका झाली.

## ३१ कांचन चमचमले

सावरकर कारेंत खरोखर अग्निदिव्य जगले ।
माती जळली मूस ओतली कांचन चमचमलें ।।

ऐरणीवरी दो सुवर्णकण ।
मोजित होते काळाचे क्षण ।
झेलत झेलत अंगावर घण ।
तेज अग्निचें मुद्रेभवतीं वलयाकृति जमलें ।
माती जळली मूस ओतली कांचन चमचमलें ।। १ ।।

किंवा स्वातींतील शिंपले ।
जलबिंदूंना धरते झाले ।
मौक्तिक ते संपुटांत बनले ।
शिंप उघडतां मोती कंठीं मानाने रमले ।
माती जळली मूस ओतली कांचन चमचमलें ।। २ ।।



शिलेंतुनी प्रतिमा घडवीती ।
टाकीने परि मानवमूर्ती ।
शासक मृण्मय करूं पाहती ।
बोथट होई टाकी ! शासन मूर्तींना नमलें ।
माती जळली मूस ओतली कांचन चमचमलें ।। ३ ।।

चणे चावणें लोखंडाचे – ।
होतें उरलें वीरवरांचें ।
म्हणुनी बंधन बंद-धराचें ।
देवत्वा पावतां भिंतिचें बंधन ढासळलें ।
माती जळली मूस ओतली कांचन चमचमलें ।। ४ ।।

अशक्य तें शक्य झालें होतें ! असाध्य साध्य झालें होतें ! हिंदुस्थानच्या भूमीवर परत पाय पडेल की नाही याची शेवटपर्यंत वानवा होती ! पण तो दिवस उगवला होता !

मे १९२१ मध्ये त्याच महाराजा जलयानाने बाबा (गणेश) आणि तात्या (विनायक) या सावरकरबंधूंना हिंदुस्थानांत आणलें. ते उतरले क्रांतीने घुमसणाऱ्या वंगभूमीवरील कलकत्त्याला.

आपल्या कपाळाला सावरकरबंधूंनी भूमीची धूळ लावली. स्वयंचलित वाहन चालावें म्हणून ठिकठिकाणीं इंधन भरावें, तसाच त्या धुळीचा उपयोग आपत्ति झेलण्याची शक्ति येण्यांत आणि देशकार्य पुढे चालविण्यासाठी झाला.

# ३२ भूमीची लावली धूळ माळाला

टाकुनी पाठिशी भूतकाळाला ।
भूमिची लावली धूळ भाळाला ।। ध्रु० ।।

ठेवला पाय नौकेंत! वाटे मना –
जिंकली ! तोडलें सागरी बंधना ।
मातृभूची करी चित्त आराधना ।
अंतरींच्या दिसे तीर डोळ्याला । भूमिची लावली धूळ भाळाला

डोलते नाव उत्तुंग लाटांवरी ।
चित्त हेलावतें सागराच्या परी ।
क्षेम भूमीस नेईल का ही तरी ?
तोच तांडा खगांचा नभीं आला । भूमिची लावली धूळ भाळाला



वाटलें मातृभू येथुनी दूर ना ।
आणि आश्चर्य ! राई दिसे लोचना ।
शाश्वतीची तयें साक्ष येई मना ।
वाहिली मानसीं क्रांतिला माला । भूमिची लावली धूळ भाळाला

वंग होता सदा क्रांतिने पेटता ।
रक्तसंमार्जनें धूळ मंत्रांकिता ।
ती विभूती शिरीं आदरे लावतां ।
शक्ति विस्तारली देशकार्याला । भूमिची लावली धूळ भाळाला

जय मृत्युंजय

ॐ, स्वस्तिक, कुंडलिनी, कृपाण आणि भगवा रंग या चिन्हांनी युक्त पताका अखिल हिंदूंची अतएव हिंदुराष्ट्राची ध्वजा म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या सूचनेवरून अखिल भारतीय हिंदुसभेने १९३६ मध्ये स्वीकारली. तीं चिन्हें काय दर्शवितात तें त्या ध्वजाच्या विवेचनांत तेव्हा दिलें होतें.


वेदकालापासून अव्याहत चाललेल्या इतिहासाचें प्रतीक ॐ, शुचितेचें चिन्ह स्वस्तिक, इडा आणि पिंगला जागृत करून जिज्ञासा उत्पन्न करणाऱ्या अंतर्मनाची खूण आणि योगसिद्धींतून मुक्तीप्रत नेणारी ती कुंडलिनी, आम्हाला जगाचा नाश करावयाचा नाही, कारण जग आम्हाला उपभोगतां आलें तर निःश्रेयस् किंवा मुक्ति, म्हणून आम्ही जगाचा अंश म्हणून जिवंत राहण्यासाठी सामर्थ्य हवें. त्याचें प्रतीक म्हणून खड्ग किंवा कृपाण आणि प्रामुख्याने त्यागावर आधारलेली ही हिंदुसंस्कृति म्हणून त्यागाचा, यज्ञाच्या सारांशाचा, ज्वालेचा, प्रतीकात्मक भगवा रंग हीं चिन्हें. परमार्थ हें ध्येय, अभ्युदय हा मार्ग. दोहोंचें मीलन सार्थपणें दाखविणारा हा हिंदुराष्ट्रध्वज !

## ३३ हिंदु राष्ट्रध्वज

ओंकारयुक्त हे ध्वजा तुला । खड्गाने बघ सहयोग दिला ।।
घेउनी साउलींत भूतला । तूं भिडवावें शिर गगनाला ।। ध्रु०।।

अंगावरचा रंग सदोदित ।
परिसीमा त्यागाची पावत ।
ज्वालेसम तव कांति विलासत ।
दीप्तीसह नर त्या विकासला । तूं भिडवावें शिर गगनाला ।।१।।

स्वस्तिकांत सामावे शुचिता ।
कुंडलिनी जिज्ञासेकरितां ।
इडा पिंगला जागृत होतां ।
योगाने पावत समाधिला । तूं भिडवावें शिर गगनाला ।।२।।



ध्येय जरी निःश्रेयस अमुचें ।
त्याला आसन अभ्युदयाचें ।
स्वत्व-रक्षणा बळ खड्गाचें ।
इह अध्यात्माची स्पृहा तुला । तूं भिडवावें शिर गगनाला ।।३।।

परमार्थाने मन भरलेलें ।
हिंदुराष्ट्र त्या पंथें चाले ।
मानवतेचें सार जाणलें ।
ओसंडत उत्सव उरांतला । तूं भिडवावें शिर गगनाला ।।४।।

हिंदुराष्ट्राचे घटक अलग अलग राहिले तर राष्ट्रच दुबळें राहतें. अस्पृश्यता-निवारणामागे हिंदुसमाजांतील फुटीरता नाहीशी करून सर्वांना घेऊन प्रगति करण्याची आणि हिंदुजाति बलशाली करण्याची सावरकरांची भूमिका होती.

रत्नागिरींतील स्थानबद्धतेंत त्यांनीं हें कार्य हातीं घेतलें. त्यासाठी लेख लिहिले. व्याख्यानें दिलीं. प्रचार केला, सहभोजनें घडविलीं. पूर्वास्पृश्यांच्या परधर्म-प्रवेशास आळा घातला.

## ३४ जातपात गुणकर्मैं येती

जातपात गुणकर्मैं आलीं जनतेचीं एका।
उच्चनीचता जन्माने हा धरूं नका हेका ।।

सर्वांना सारखें गणा
नका म्हणूं अस्पृश्य कुणा
हिंदू तितुका एक ! बंधनें भेदाचीं फेका।
उच्चनीचता जन्माने हा धरूं नका हेका ।। १ ।।

एकचि अपुला देव नि देश्
कामापुरते विभिन्न वेश्
देशावरची निष्ठा वेशें विचलित होते का ?
उच्चनीचता जन्माने हा धरूं नका हेका ।।२।।

हिंदुत्वाची विशालता
जात्युच्छेदें स्थिर होतां
होऊं आम्हीं बलाढ्य जगतीं नसो कुणा शंका।
उच्चनीचता जन्माने हा धरूं नका हेका ।।३।।



रत्नागिरींत स्थानबद्ध असतांना स्वातंत्र्यवीर सावरकर सामाजिक सुधारणा-विषयक लेख लिहीत आणि सुधारणा घडवून आणीत. रूढिग्रस्त पोथीनिष्ठ सनातन्यांनीं सावरकरांवर आग पाखडली. आज पेशवाई असती तर सावरकरांना हत्तीच्या पायीं दिलें असतें, असें सनातन्यांचें अनुमान.

सावरकरांनीं उत्तरासाठी एक लेख लिहिला. वरील प्रकारच्या दळभद्र्या अनुमानापेक्षा, आज पेशवाई असती तर आपण कुठे असतों याचें स्वप्न त्यांनी रंगविलें –

## ३५ विजयाचा सण आला

विजयाचा सण आला । मेळा प्रांगणिं जमला ।
व्योमीं स्वर दुमदुमला ।
देण्याला वंदना ध्वजाला ।
या महोत्सवाला ।। ध्रु० ।।

पंक्तींत पदाति, वाजि, गज, रथ, रणभेरी
अत्यधुनिक तोफा अन् अण्वस्त्रें भारी ।
चढतां ध्वज आकाशीं वाजली तुतारी
करित पुरश्चरण सर्व सैन्य शस्त्रधारी ।
सेनानी हा पहिला । प्रतिशोधा प्यालेला ।
आला मर्दुनि अरिला ।
देण्याला वंदना ध्वजाला ।
या महोत्सवाला ।।१।।

छळण्याला जे जे या भारतांत आले
शक्त पदाघाताने सर्व ते निमाले ।
शक्तिशालि भूवरि जे देश मानलेले
पाहुनी सशक्त राष्ट्र आज नम्र झाले ।
राजदूत गण जमला । ध्वज गगनीं जैं चढला ।
जोडुनी करां नमला ।
देण्याला वंदना ध्वजाला ।
या महोत्सवाला ।।२।।



ध्रुव दोन्हीं हिंदुराष्ट्रसंघ आक्रमीतो
वैद्यक, वाणिज्य, कला क्षेत्र शोधतो तो ।
अवकाशीं फिरूनि कुणी विश्वशोध घेतो
रत्नाकर शोधुनि वा देशरत्न होतो ।
विद्या विज्ञान कला । पावती स्वदेशाला ।
शिवनृपवंशज आला ।
देण्याला वंदना ध्वजाला ।
या महोत्सवाला ।।३।।

साहित्याच्या पीठावरून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी तरुणांना उपदेश केला, " लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या ! " त्याचें तात्पर्य होतें.

आज आवश्यकता आहे काव्यविषय बनणाऱ्यांची. लेखण्यासाठी वापरण्याची शक्ति खड्गांसाठी हवी आहे. कविता थांबू शकेल. तरुणांचें सळसळतें रक्त देश-मुक्ततेच्या आणि देशरक्षणाच्या कार्यासाठी पाहिजे आहे.


## ३६ लेखण्या मोडा

ठेवा मोडून लेखणी । खड्गाला घ्या चला रणीं ।
पुरवा सामग्री पुढच्यांना काव्य करो आणखी कुणी ।। ध्रु ।।

साहित्याची शैवलिनी
वाहे दुथडी भरभरुनी
गेलां तुम्हीं समरावर जर पडेल कां ती तये उणी ।। १ ।।

वय तुमचें तारुण्याचें
रक्त नवें सळसळण्याचें
कुमुद कौमुदी यांवर नाही समर्थतेची उभारणी ।। २ ।।

देशाला सामर्थ्य हवें
लेखणी न केवळ पुरवे
खांद्यावर बंदूक टाकुनी सिद्ध रहा देशरक्षणीं ।। ३ ।।



"होय ! मला हिंदुराष्ट्र निर्माण करावयाचें आहे ! गटे म्हणाला होता, माझा राजा माझ्या देशांत येईपर्यंत आणि परकी राजा जाईपर्यंत मी असाच भीक मागत हिंडेन ! त्याची वल्गना पांच पिढ्यांनी मूर्त स्वरूपांत आली ती हिटलरचें सामर्थ्य घेऊन ! "

दुसरें महायुद्ध चालू झालें होतें. स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यांतील लोकमान्य टिळक मंदिरांत बोलत होते. 'मलाहि एक वल्गना करूं द्या ! माझें गाणें मला गाऊं द्या. हा माझा वारसा मी तुम्हास देत आहें.'

## ३७ गाणें माझें गाऊं द्या

हिंदुराष्ट्र अन् हिंदूंचा ध्वज
करो नियंत्रित हिंदुस्थानला ।
गाणें माझें गाऊं द्या मला ।। ध्रु० ।।

बीज वडाचें राईएवढें ।
सुप्तस्फूर्ती येई जों पुढें ।
झाड भूवरी वाढे केवढें ।
पुनरुत्थापन-शक्तिसवें त्या
भारतांतला हिंदू जन्मला ।
गाणें माझें गाऊं द्या मला ।। १ ।।

इतिहासांतुनि वाटे जें मना ।
त्याच्या करतों मी रेखाटना ।
ठरो सत्य वा केवळ वल्गना ।
स्वतंत्र उन्नत उदात्त भारत
जगांत मिरवत पाहूं द्या मला ।
गाणें माझें गाऊं द्या मला ।। २ ।।



म्हणोत मजला वेडा, मूढ वा ।
मातें विजयाअंतीं आठवा ।
ठरेन तेव्हा द्रष्टा मी नवा ।
तुम्हां वारसा या स्वप्नाचा
या कार्याचा देतों आजला ।
गाणें माझें गाऊं द्या मला ।। ३ ।।

" इंग्रजांचे पुतळे हलविण्याच्या उपक्रमापेक्षा इंग्रजांनाच हलविण्याच्या मार्गाला लागा; मी आपल्या तरुणांना सैन्यांत पाठवितों. शस्त्रें इंग्रजच देतील. तुम्ही परदेशांत जा. शत्रूच्या शत्रूशीं संधान बांधा. आपल्या सैन्याचा रोख इंग्रजांवर फिरवा. ही पुन्हा संधि आली आहे. तुम्ही या कार्याला योग्य आहांत."

देशगौरव सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची भेट घेतली होती दिनांक २२–६–१९४० ला. वरील शब्द तेव्हाचे आहेत.

सुभाषबाबूंची हिंदुस्थान स्वतंत्र करण्यासाठी सेना (आझाद हिंद सेना) किंवा आय्. एन्. ए. ( Indian National Army ) म्हणून प्रसिद्ध आहेच.

## ३८ रोख सैनिकांचा फिरवा

संधि पुन्हा आली बंधो । जा तुम्हीं रणाला ।
रोख सैनिकांचा फिरवा । मुक्ति या क्षणाला ।। ध्रु० ।।

पुरवीन युवक मी, त्यांना शस्त्र इंग्रजांचें ।
होईल युद्धयज्ञाला सैन्य सिद्ध त्यांचें ।
मान ऋत्विजाचा घ्यावा देशधारणाला ।
रोख सैनिकांचा फिरवा । मुक्ति या क्षणाला ।। १ ।।

नाशितां रिपूच्या मूर्ती जात शक्ति वाया ।
भूमि रंगवा रक्ताने शत्रु घालवाया ।
उभे करा आज्ञेमध्ये तरुण मारणाला ।
रोख सैनिकांचा फिरवा । मुक्ति या क्षणाला ।। २ ।।



मित्र आपला शत्रूचा शत्रु, जाणतां ना ?
शक्त सैन्य साह्या राही चाल योजतांना ।
स्मरा नित्य शिवरायाच्या राजकारणाला ।
रोख सैनिकांचा फिरवा । जा तुम्ही रणाला ।। ३ ।।

ऐकली उक्ति नेत्याची देशगौरवांनी ।
युक्तिने लंघिली सीमा घेतली भवानी ।
रंगविली प्राची प्राणां लावुनी पणाला ।
रोख सैनिकांचा फिरवा । जा तुम्ही रणाला ।। ४ ।।

जय मृत्युंजय

काँग्रेसमधील पाकिस्तानवादी हिंदु युक्तिवाद करीत, अहो, आम्ही कावा म्हणून सध्या पाकिस्तान मान्य करणार आहोंत. एकदा का ब्रिटिश गेले की, आम्ही हिंदु-संघटन करू आणि मुसलमानांची आक्रमक वृत्ति धाकांत ठेवूं.

आज मी सात वर्षाचा आहें; भाऊ नऊ वर्षाचा आहे; दोन वर्षांनी मी भावाबरोबरीचा होईन; आणखी दोन वर्षांनी मी भावापेक्षा दोन वर्षांनी मोठा होईन; अशा बालिश युक्तिवादासारखा तो युक्तिवाद असे. कारण हिंदु आपलें संघटन करीपर्यंत मुस्लिम राष्ट्र कांहीच करणार नव्हतें, अशी यांची भावडी, नव्हे, आत्मवंचक भीतिजन्य कल्पना होती.

सावरकरांनी १९४२ मध्ये – पाकिस्तान निर्माण होण्यापूर्वी पांच वर्षें या भ्रांत विचारधारेचा परामर्श घेतला. कानपूरला भरलेल्या हिंदुमहासभेच्या वार्षिक अधिवेशनांत ते बोलत होते. त्यांच्या शब्दांत :–

"पण मध्यंतरींच्या काळांत मुसलमान काय स्वस्थ बसतील असें तुम्हास वाटतें ? तेहि आपली सत्ता वाढवून प्रबळ होतील आणि सरसीमेपलीकडील आपल्या

# ३९

जनहो – पाकिस्तान भारतीं जर निर्माण कराल् ।
स्वरूप घेइल छलकाचें तें राष्ट्र नवें विकराल् ।।ध्रु०।।

म्हणतां अमुची असे चाल ती
तडजोड असे ती तात्पुरती ।
इंग्रज इथुनी गेल्यावरती
हिंदू होतिल समर्थ जगतीं ।
वेडयांनो, उलटेल तुम्हांवर पोकळ मायाजाल् ।
स्वरूप घेइल छलकाचें तें राष्ट्र नवें विकराल् ।। १ ।।

बघाल त्या देशांत कुणीही
भ्रान्तिभक्त राहणार नाहीं ।
आज मानतां ज्याला भाई
हिंदुहिताला तुडविल पायीं ।
सोडा ढोंगी देशभक्तिला ना तरि गोता खाल्, ।
स्वरूप घेइल छलकाचें तें राष्ट्र नवें विकराल् ।। २ ।।


जातभाईंशीं धागेदोरे जमवून प्रबळ अशा पठाणिस्तानची आणि पाकिस्तानची सिद्धि होईल.

"आणखी एक गोष्ट विसरूं नका. त्यांच्या पाकिस्तानांत काँग्रेसवृत्तीचा एकहि माणूस उरणार नाही. मात्र तुमच्या हिंदुस्थानांत प्रत्येक प्रांतांत मुसलमान अल्पसंख्य म्हणून राहणार व काँग्रेसवाल्या हिंदूंवर सदैव दडपण आणून त्यांना पाकिस्तानवाल्यांपुढे प्रत्येक वेळीं शरणागति पत्करायला लावण्याचा प्रसंग आणणार. हिंदु-मुसलमान एकीच्या ढोंगी देशभक्तीसाठी आणि भ्रांत स्वातंत्र्यासाठी तुम्हास हा त्याग करावयाची पाळी येणारच."

फाळणीनंतर आज २१ वर्षे आपण वरील उक्तीचा अनुभव पावलोपावलीं घेत आहोंत. कारण सावरकरांना आम्ही देशविघातक, प्रतिगामी ठरविलें होतें. आणि फाळणीच्या पक्षपात्यांना देशोद्धारक आणि पुरोगामी ठरवून त्यांची पूजा केली होती.

## पाकिस्तान निर्माण कराल तर ....

मात्र तुम्ही ठेवाल भारतीं
अल्पसंख्यता प्रांतोप्रांतीं ।
दडपण त्यांचें आल्यावरती
फिराल मागे ठेवुनि भीती ।
आंतुन बाहेरून चेपतां जनहो, कोठे जाल् ?
स्वरूप घेइल छलकाचें तें राष्ट्र नवें विकराल् ।। ३ ।।



व्हा हिंदूनो, समर्थ, जागृत,
स्वतंत्र, बोला अखंड भारत ।
हृदयीं ठेवा असिधाराव्रत
पौरुषांत हो राष्ट्राचें हित ।
वेळीं या शुद्धींत, अन्यथा बसाल चोळत गाल्, ।
स्वरूप घेइल छलकाचें तें राष्ट्र नवें विकराल् ।।४।।

जय मृत्युंजय

भारत खंडित झाला आहे. तरी पण स्वराज्य मिळालें आहे. रक्ताच्या मोलाने तें मिळालें. त्यागाने तें मिळालें.

स्वराज्य टिकविणें हें आता निकडीचें काम आहे. प्रथम सीमा निर्धारित करा. सीमेवर वादग्रस्त प्रश्न उभाच राहू देऊं नका. आपली सुसज्ज सेनाच तिथे उभी ठेवा. विज्ञानशास्त्राने उन्नति करा. सेना बलवान् करा. शत्रूने दमदाटी चालू केली तर त्याला भरडून काढा. स्वराज्य टिकविण्याचा हा मार्ग आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी वेळोवेळीं सांगितलेल्या वचनांचें हें सार आहे.

## ४०

स्वराज्य मिळालें कसें ?

**भेदुनी आत्मतेजें तमाला । भानु पूर्वेस जैसा निघाला ।**
**जाउनी आंग्ल सत्ता लयाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।।ध्रु।।**

**देश हा आपला । शत्रुने व्यापला ।**
**तोडुनी शृंखला । मुक्त होऊं चला ।**
**लागला ध्यास हा भारताला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। १ ।।**

**देत आत्माहुती । या ध्वजाभोवतीं ।**
**वा लढोनी किती । शत्रुला मारिती ।**
**वंदना त्या महाक्रांतिकाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। २ ।।**

**आंग्लसेना रणीं । जिंक्य ना पाहुनी ।**
**क्रांतिकारी कुणी । पुत्र भूचे गुणी ।**
**घालती हात विस्फोटकाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ३ ।।**

**शोणिताची धरी । धार साध्यावरी ।**
**पेटलेली उरीं । आस होई पुरी ।**
**भाग कांही जरी भंगलेला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ४ ।।**

स्वराज्य टिकेल कसें ?

**देशसीमा भुवीं । आखण्याला नवी ।**
**रोखण्या यादवी । सिद्ध सेना हवी ।**
**हार येते जगीं दुर्बळाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ५ ।।**

# देश दास्यांतुनी मुक्त झाला

वस्तुशास्त्रांतली । पाहिजे भूतलीं ।
योग्यता वाढली, । यास्तवें आपली ।
द्या मती यांत्रिकोत्पादनाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ६ ।।

शांतिसद्भावना । मानिती लोक ना ।
शस्त्रशक्तीविना । फोल त्या वल्गना ।
अद्ययावत् करा शस्त्रशाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ७ ।।

चार सीमांतला । भ्रांतिने जो दिला ।
भाग तो आपला । पाहिजे घेतला ।
कृष्ण राही नियंता रथाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ८ ।।

कोण आता जरी । पाय ठेवी शिरीं ।
आडवीतां वरी । वार शस्त्रें करी ।
मस्तकीं शत्रुच्या घाव घाला । देश दास्यांतुनी मुक्त झाला ।। ९ ।।



जय मृत्यं

संभ्रमांत हाकारलेल्या तारवाने गटांगळी खाल्ली ! १५–८–१९४७ ला फाळणीसहित स्वराज्य आले. शांतीचा उपदेश विद्ध झाला होता. अघोषित युद्ध चाललें होतें. वैचारिक पक्षाघाताच्या आपत्तींत गांधीजींचा दुर्दैवी अंत झाला.

पाकिस्तान हें मुस्लिम धर्माधिष्ठित राष्ट्र निर्माण झालें होतें. त्या भूमीवर मूलतः असलेले हिंदु राष्ट्रद्रोहाचे आरोपी झालेच होते. हिंदुस्थानांत हिंदुत्व आरोपी झालें होतें !

हिंदुत्वाच्या प्रतीकाला आरोपींच्या पिंजऱ्यांत उभें केलें गेलें.

आणि दिनांक १०–२–१९४९ ला स्वातंत्र्यवीर सावरकर सन्मानाने मुक्त झाले. हिंदुस्थानचें मंगल व्हावें म्हणून तर्कशुद्ध विचार मांडण्याची त्यांना नियतीनेच संधि दिली !

# ४१

धर्मातीतत्वाच्या नांवें भारत आम्हीं भंगला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ध्रु ।।

बोध घेतला नाही आम्हीं लिहिलेल्या पानांतुनी ।
प्रयोग करतां नवा भारतीं रक्ताची वाहे धुनी ।
युद्धावांचुन रक्त सांडलें ! कलंक आम्हां लागला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। १ ।।

परकीयांना सामंजस्यें हिंदूपण सामावतें ।
वंशजाति एकत्व साधती हिंदुत्वाचीं दैवतें ।
हिंदुत्वावर उठण्या जेव्हा वैरी येथे दंगला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। २ ।।

आम्हीं जपली शांति बांधलें बिसतंतूने कुंजरा ।
उधळे जैसा मत्त मतंगज थरकापत राही धरा ।
अंकुशांतल्या उभ्या शांतिचा वास न आम्हीं पाहिला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।।३।।


अंतर नाही देव नि दानव यांच्यामधलें जाणलें ।
आक्रमकांना राष्ट्रामध्ये आसन मानाचें दिलें ।

# गांधीहत्या अभियोग

अभय दानवा दिलें शांतिचा अर्थ न आम्हां लागला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ४ ।।

दान दिलें परि भूक न शमली उन्मादी कामापरी ।
शांति चिरफळे प्रांतोप्रांतीं खड्गाच्या धारेवरी ।
टाक अगोदर माझा वांटा सोसाटा फोफावला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ५ ।।

तत्त्वें उत्तम! परंतु होतीं भ्रांतीने व्यवहारिलीं ।
करीं ठेवली पात, मूठ अन् आम्हीं वैऱ्याला दिली ।
अंगावरती उलटुनि आली तत्त्वांची त्या शृंखला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ६ ।।



वन्हि चेतला होता चित्तीं पाहुनि तांडव भारतीं ।
ज्वाला जाती वाऱ्यासंगे शांतिकोविदा घेरती ।
शांतिवचांचा तो उद्गाता पंचत्वाला पावला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ७ ।।

हिंदुत्वावर दोष लादला तेव्हाच्या अधिनायकें ।
चाळण सांगे उपहासाने छिद्रवती तू सूचिके ।

गळ्याभोवतीं हिंदुत्वाच्या दोर मृत्युचा बांधला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ८ ।।

चंद्र चोरतो प्रकाश रविचा म्हणवीतो तारापती ।
राष्ट्रामध्ये बुद्धचंधांच्या चोर ऋषींचे भूपती ।
त्याग कुणाचा? त्यागावरती सौध कुणी हो बांधला ?
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ९ ।।

हिंदुत्वाचें प्रतीक पडलें आक्षेपांच्या पंजरीं ।
चार दिशांनीं भाले बरच्या तळपत होत्या संगरी ।
पर्वत पडला ! गजराजाचा दंतहि नाही भंगला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। १० ।।

जो मत्युंजय शिवे न त्याला यम स्वतां यमदूत वा ।
मुक्त विनायक सांगे आम्हां हिंदूंच्या गतवैभवा !
स्वातंत्र्याचा वीर इच्छितो भारतभूच्या मंगला ।
श्यामल कोमल भाग भूमिचा शस्त्राघातें रंगला ।। ११ ।।


गांधीहत्या अभियोगांतून स्वातंत्र्यवीर सावरकर मुक्त झाले. दि. १०-२-१९४९ हा तो दिवस. सौ. माईंचें सौभाग्य मिळालें. विश्वास आणि प्रभात यांना पितृछत्र मिळालें. प्रेम- भावनांची उत्कट आरती त्यांनी ओवाळली.

# ४२ अभियोगांतून सुटका

जिंकुनी मृत्यु आम्हांला आलां हो
आरती प्रीतिची आपणांला ।। ध्रु० ।।

व्यग्र कांता पुन्हा एकदा
ये अशी कां अहेवीं गदा
भेडसावीत वारा सदा--
तेवत्या शान्त नीरांजनाला
आरती प्रीतिची आपणांला ।।१।।

पुत्र विश्वास कन्या प्रभात्
काढती जागुनी रात रात्
वेढलें मृत्युने पुण्य तात्
मुक्ततेने तयां मोद झाला
आरती प्रीतिची आपणांला ।।२।।



जागऱ्या सुप्त संवेदना
कंठ दाटे फुटे शब्द ना
अश्रु ओलांडती लोचना
आणि येती पुढे स्वागताला
आरती प्रीतिची आपणांला ।।३।।

धीर नेता स्थितप्रज्ञ तो
आसवें दोन कां ढाळतो
शोक आनंद वा क्रोध तो
अर्थ राही जलें झाकलेला
आरती प्रीतिची आपणांला ।।४।।

जय मृत्युंजय

अभिनव भारताचा सांगता समारंभ पुण्यांतील क्रांतिनगरांत चालू होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या व्याख्यानमालेंतील एक पुष्प दिनांक ११ मे १९५२ ला गुंफले गेलें होतें. आपल्या स्नानाच्या मंत्रांतील अपूर्णता स्वातंत्र्यवीरांना जाणवली आणि त्यांनी सिंधूला आश्वासन दिलें : " महाराष्ट्र तुला कधीहि विसरणार नाही. "

# ४३

मुक्त आजला गंगा, यमुना, गोदावरि अन् सरस्वती
आणि नर्मदा, कावेरी, परि सिंधु कुठे मुक्त भारती ?
स्नानासाठी अनुपस्थित का तुझें सलिल हे अंबितमे
कुणी लोटले दूर तुला गे ! तुजविण अपुरें स्नान गमे !
परचक्राचें तुला नियंत्रण ! हाय ! काय तुझी ही स्थिती !
आद्य ऋषींचे वंशज देवी ! तुला कसे गे विस्मरती !
म्लेंच्छ रेटुनी परतीरीं जो विजयें प्याला तुझ्या जला
पराक्रमाने पुन्हा सोडविल महाराष्ट्र एकला तुला !
तुझ्या तटावर वसलेले
ऋषिवर तप करते झाले
देव तुझ्या तोयें धाले
स्थान तुला देवीचें दिधले, तोषविले तूं महीतला
पराक्रमाने पुन्हा सोडविल महाराष्ट्र एकला तुला
सिंधूवांचुनि हिंदू, सरिते ! अर्थावांचुनि शब्द जसा
प्राणावांचुन कुडी जशी वा रवितेजावांचून रसा
जिथे घडविलीं सामगायनें पहिलीं, पहिल्या ? वेदऋचा
संध्यावंदन करुनि भास्करा अर्घ्य दिलें ओघांत जिच्या
सुंदर सूक्तें रचिलीं जेथे, यज्ञ मांडती जिथे मुनी
मंत्रोच्चारासवें आहुती करती अर्पण हुताशनी
सिंधु-हिंदुच्या भाग्याचें
संस्कृतीच्या संबंधाचें
नातें का विसरायाचें ?

# पराक्रमाने पुन्हा सोडविल !

विसरो कोणी ! ऋणास राहिल सह्याद्री नित्य जागला
पराक्रमाने पुन्हा सोडविल महाराष्ट्र एकला तुला
अशीच पूर्वी अंतरली तूं येतां म्लेंच्छांचा घाला
उत्तर विजयावांचुनी गेले शिवप्रभू निजधामाला
सरसावे सेना विजयाला, चंबळ, यमुना जल प्याली
न्हाली गंगेमधे, शतद्रू आणि वितस्तेवर आली
ओलांडत चौखूर नद्या त्या सेना तव तीरीं गेली
अटकेवर लावली ध्वजा अन् भूमि तुझी पावन केली
उन्मादाने थयथयती
भीमथडीचे हय, पीती
सिंधूच्या तीरावरती
बांधतील ते पुन्हा ध्वजाने हिंदु-सिंधुला हिमाचला
पराक्रमाने पुन्हा सोडविल महाराष्ट्र एकला तुला !



जय मृत्युंजय

हिंदुस्थानची विभागणी मान्य केली गेली. ती मुस्लिम बहुसंख्य असलेल्या प्रांताचें पाकिस्तान व्हावें आणि हिंदु बहुसंख्य असलेल्या प्रांतांचें उर्वरित हिंदुस्थान रहावे या तत्त्वावर.

हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांत लोकसंख्येची वाढ फाळणीच्या वेळेच्या प्रमाणांत झाली नाही. पाकिस्तानांतून हिंदु नाहीसे करण्याचा उपक्रम चालविला गेला. हिंदुस्थानांत हिंद्वेतर समूहांनी म्हणजे मुसलमान आणि ख्रिश्चन यांनी हिंदूंना बाटवून आपापल्या समूहाचें संख्याबळ वाढविण्याचा क्रम चालू ठेवला आहे. याचा पवताळा विधानसभांतून वेळोवेळीं होणाऱ्या चर्चावरूनहि दिसून येतो.

परिणाम असा होत आहे की, हिंदु हें राष्ट्र म्हणून पोखरलें जात आहे. दुबळें होत आहे. कारण परनिष्ठेला विलगलेले लोक आपली सांस्कृतिक, धार्मिक, पौराणिक, राजकीय आणि म्हणून राष्ट्रीय निष्ठा भारताबाहेर ठेवीत आहेत. प्रत्यक्ष

# ४४

घडतां भूवर या निष्ठान्तर हिंदुत्वचि नुरतें ।
म्हणुनि ते राष्ट्रान्तर ठरतें । ध्रु० ।।

मोगल सत्ता उधळायाचा
कशास आटापिटा शिवाचा
स्वातंत्र्याचा, हिंदुत्वाचा
परकी मोगल होते म्हणुनी सत्ता पर ठरते ।। १ ।।

मोगल नसते जर परके तर
बाटविण्याचें कां अवडंबर
कां नाही केलें धर्मांतर
असती ही पुण्यभू तयां तर हिंदुत्वा वरते । ।। २ ।।

धर्मांतचि सीमा राष्ट्राची
धर्मांतर भाडी दास्याची
स्वत्व नि भूमी बुडवायाची
नसतें ठावें तर संभाजी धर्मांतर करते ।। ३ ।।

अगणित हिंदू शीख वीरवर
श्री बंदा गुरु तेगबहादर
धर्माच्या मरती वेदीवर
इस्लामाला राष्ट्र आपलें ते मानत नव्हते ।। ४ ।।

राष्ट्रान्तराची, म्हणजेच उर्वरित हिंदुस्थानचा भूभागहि तोडून घेण्याची ती पूर्वसिद्धता आहे.


धर्मान्तर हें राष्ट्रान्तर आहे हें स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी वेळोवेळीं सांगितलें आहे. आज ओरिसाला उंबऱ्याशीं धोका दिसूं लागल्याने त्याने तसा विधि केला आहे.

धर्मान्तर हें राष्ट्रांन्तर नसतें तर हिंदुत्व टिकविण्यासाठी आपल्या पूर्वजांना "स्वातंत्र्या"च्या नांवाने मुसलमानी सत्तेविरुद्ध लढण्याचें कारण नव्हतें. तसेंच आज हिंदुस्थान फाडून मागण्याची म्हणजे पाकिस्तान निर्माण करण्याची कल्पना निघाली नसती. मुस्लीम संख्याबळ भ्रष्टीकरणाने वाढले. त्यांतून विभक्तपणा आला. स्वातंत्र्यवीरांच्या "धर्मान्तर हे राष्ट्रान्तर" या सूक्ताचा थोडा विस्तार या कवितेंत आहे.

## धर्मान्तर हें राष्ट्रान्तर

किती पद्मिनी जाती जळुनी
प्रताप लढले राष्ट्ररक्षणीं
कारण सत्ता होती यवनी
तेच अन्यथा मानसिंहपथ मोदें अनुसरते ।। ५ ।।

ख्रिस्तोपासक येत कासया
दाखविण्याला कां भूतदया ?
संस्कृतिचा कां तिरस्कार या ?
हिंदुत्वच्छेदनीं येत कां प्रेमाला भरतें ।। ६ ।।



संख्या आहे बल राष्ट्राचें
संस्कृतिमध्ये जीवन त्याचें
एकत्वा सांभाळायाचें
ती निष्ठा अन्यत्र ठेवतां राष्ट्रा पोखरते ।। ७ ।।

पितृभू आणिक पुण्यभूमि ही
ज्याची त्याचा भारत राही
राष्ट्रियत्व अन्यांना नाही
जागृत राही राष्ट्र तें अशा निकषा वापरतें ।। ८ ।।

जय मृत्युंजय

वर्ष १९५७ मध्ये दिल्लींतील मेळाव्यांत स्वातंत्र्यवीर सावरकर अनुयायांना म्हणाले, "तुम्ही माझ्या मागे आलांत खरे पण मी तुम्हाला मात्र कीर्ति, संपदा, कांही देऊं शकलों नाही. तिरस्कार, उपेक्षा, अपमान, यातना हेंच तुमच्या वांट्याला आलें. हिंदु संघटनाचा हा खडतर मार्ग, तरीहि तुम्ही अनुसरीत आहांत."

# ४५

देउं न शकलों तुम्हां संपदा, मान, कीर्तिची माला ।
तिरस्कार अपमान यातना ये तुमच्या वांट्याला ।
जनहो, मागुति माझ्या आलां ।। धृ ।।

शाप नियतिचा या सरणीला
पंथ कंटकांनी भरलेला
रक्त आंसवें पदा पदाला
स्वत्वाच्या यज्ञीं तरुणांच्या त्यागा देव भुकेला ।
जनहो मागुति माझ्या आलां ।। १ ।।

अन्य पथाने गेला असतां
त्याग अल्प जर केला असतां
कोठे मंत्री झाला असतां
ल्यालें असतें वसन पांढरें, 'देशभक्त' बिरुदाला ।
जनहो मागुति माझ्या आलां ।। २ ।।

सप्तपदी विरहाग्नीभंवतीं
मुंडावळ अश्रूंचे मोती
मंगळसूत्रावर ओघळती
वरला छळ साक्षात् युवतींनो ! संगे पतिच्या गेलां ।
जनहो मागुति माझ्या आलां ।। ३ ।।

जनहित वाटे श्रेष्ठ, ना स्तुती –
ज्यांना, ते या पंथा मिळती
अंबर फाटो, दुभंगो क्षिती,

# जन हो मागुति माझ्या आलां

वा गेहाचा बनो उन्हाळा, भिडो शूळ हृदयाला ।
जनहो मागुति माझ्या आलां ।। ४ ।।

चार मावळ्यांसह शिवराया
धजला दिल्लीशा हलवाया
स्वतंत्र म्हणुनी अभिषेकाया
जीवमान चैतन्य अल्पही पुरतें उत्थानाला ।
जनहो मागुति माझ्या आलां ।।५।।

निष्ठेच्या या अनुयायांना
वस्तु काय देऊं उपायना
हिंदूंची घडवा संघटना
राष्ट्राला मात्रा गुणकारी एकचि या काळाला ।
जनहो मागुति माझ्या आलां ।।६।।



जय मृत्युंजय

ब्रिटिशांनीं सावरकरांची स्थावरजंगम संपत्ति हृत म्हणजे जप्त केली होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर लोकांनी आपल्या शासनाकडे मागणी केली होती की, ती राजहृत मत्ता सावरकरांना परत मिळावी.

सावरकर आणि देश एकरूपच झालेले आहेत; त्यांना ती संपत्ति परत देणें म्हणजे सावरकरांना लहानपणा आणणेंच होय; अशा विचारानेच बहुधा, आपल्या शासनाने ती समपहृत मत्ता त्यांना परत दिली नाही.

आणि एकदा सावरकरांनी स्वतःच स्पष्टीकरण केलें, सारा देश जिथे माझा झाला आहे तिथे तो शेताचा तुकडा घेऊन मी काय करूं ! जो कुणी तो खात असेल तो सुखेनैव खावो, त्याचा वंश वाढो, माझे त्याला आशीर्वाद आहेत. यज्ञांत फेकलेलें अनेक पटींनी उगवलें आहे. भारताचाच मी स्वामी आहे.

# ४६

स्वाधीन देश झाला तप येतसे फळाला
हृत संपदा कशाला? नृप मीच भारताला ।। ध्रु० ।।

अंगावरी सतीचीं वस्त्रें विराजतांना
देशार्थ देह माझा आगींत पोळतांना
पुष्पें वहात होतों स्वातंत्र्यदेवतेला ।
हृत संपदा कशाला नृप मीच भारताला ।। १ ।।


घरदार वित्त मत्ता यज्ञांत लोटलेली
क्षणमात्र अग्निमाजीं वाटे जळून गेली
आली परी वरी ती, घेई विशालतेला ।
हृत संपदा कशाला नृप मीच भारताला ।। २ ।।

वांटा सुखेन लाभो स्वातंत्र्यसैनिकांना
त्यांनीहि कष्ट केले देशार्थ झुंजतांना
देशांत घोळलों मी, माझ्यांत देश आला ।
हृत संपदा कशाला, नृप मीच भारताला ।। ३ ।।

## नृप मीच भारताला

हृत शेत वा घराची इच्छा मुळीच नाही
सारात्र देश माझा देशांत भूमि तीही
खावो सुखे कुणीही भूजन्य त्या कणाला ।
हृत संपदा कशाला, नृप मीच भारताला ।। ४ ।।

इच्छा असे, परी ती पूर्वार्जितांत नाही
बव्हंश देश माझा राष्ट्रध्वजांत राही
एका चतुर्थकाला आणील कोण बोला ?
हृत संपदा कशाला, नृप मीचा भारताला ।। ५ ।।



"राष्ट्रपतिपदाची मला इच्छा नाहीं ! त्या पदाइतका मान मी उपभोगीत आहे.

"पण तुम्हीं मला राष्ट्रपति केलें, तर दोन वर्षांच्या आंत हा देश मी शक्तिशाली घडवीन ! "


स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं दि. २४–१२–१९६१ ला मृत्युंजय दिनाच्या पुणें येथील भाषणांत हे उद्‌गार काढले.

# ४७ राष्ट्रपतीपद राहो ज्याचें त्याला

शपथ सांगतों ! राष्ट्रपतीपद राहो ज्याचे त्याला ।
राष्ट्रपती या पदावांचुनी मज तो मान मिळाला ।। ध्रु० ।।

हारांनी मस्तक नत झाले,
दर्शनास्तवें लोक भुकेले
उपहारांनी कर भरलेले
उधाण येई नगरोनगरीं स्नेहाविष्काराला ।
राष्ट्रपती या पदावांचुनी मज तो मान मिळाला ।। १ ।।

झालों परि मी राष्ट्रपती जर
विसंबून तुमच्या इच्छेवर
बघा देश दो वर्षांनंतर
असेल भारत शस्त्रास्त्रांनी स्वयंपूर्ण झालेला ।
राष्ट्रपती या पदावांचुनी मज तो मान मिळाला ।। २ ।।



फिरेल सेना सीमेवरती
राहतील नभयाने फिरती
कोण शत्रु मग भू कातरती ?
मानतील ते समर्थ, सात्विक तेव्हा या देशाला ।
राष्ट्रपती या पदावांचुनी मज तो मान मिळाला ।। ३ ।।

निर्माण्या चालतील निशिदिन
यंत्रांचें करण्या उत्पादन
होइल युक्तीने जलवितरण
अन्नाची कां चिंता आम्हां करतां वश वरुणाला ।
राष्ट्रपती या पदावांचुनी मज तो मान मिळाला ।। ४ ।।

(निर्माणी = कारखाना)

६ । ८७

देशाला हानिकारक घटना घडली की, आम्हाला आठवत. कारण, सावकरर असें वागाल तर असें होईल हें ते आधी सांगत असत. पण त्यामुळे आम्ही पुढे तरी शहाणे झालों म्हणतां काय? छे: ! आमच्यांत अहंता होती. अहंता आणि विवेक यांचें वाकडें असतेंच !

सावरकरांचा मृत्यु झाल्यावर आम्ही त्यांच्या द्रष्टेपणावर स्तुति आणि स्मृति-सुमनें वाहिलीं ! त्यांच्या आदेशाने आम्ही वागलों असतों तर?

पण ! दैव देतें, कर्म नेतें !

# ४८ दैव देतें कर्म नेतें

कैक अयनें लोटती अन् रत्न कोणी जन्म घेतें ।
लोपतां आभा जनांना कौस्तुभाची जाण येते ।
दैव देतें कर्म नेतें ।। ध्रु ।।

पाहती ना जोंवरी तो ।
लोकचिंता वागवीतो ।
संकटांना तोंड देतो ।
मात्र होतां राख त्याच्या गीत गाती गौरवातें ।
दैव देतें कर्म नेतें ।। १ ।।



राष्ट्र तारी सिद्ध सेना ।
शत्रु खाई दुर्बलांना ।
हिंदु-नेता सांगतांना – ।
कान केले बंद आम्हीं । भाळलों संमोहनातें ।
दैव देतें कर्म नेतें ।। २ ।।

व्हावयाची शक्तिशाली ।
बुद्धि ना आम्हास झाली ।
फाळणी हातांत आली ।
अन्यथा "आदर्श" होती प्राप्त पदवी भारतातें ।
दैव देतें कर्म नेतें ।। ३ ।।

गोवा मुक्त करण्यासाठी हिंदुस्थानने पोर्तुगीजांवर स्वारी केली. त्या वेळीं मुंबईत कांही धर्ममार्तंडांनी सद्हेतूने एक महायज्ञ आरंभिला होता. आयोजक स्वातंत्र्यवीरांचा आशीर्वाद मागण्यास गेले असतां सावरकर म्हणाले –

अहो, गोव्यांत तो महाप्रकल्प उभा केला आहे. त्यांत आहुति टाकण्यास तरुणांना धाडा. तो खरा यज्ञ आहे. हवन तेथे हवें आहे.

# ४९

आणा निज गोमंतक जिंकुनी घरा।
कंठनाळ शत्रूचा सायकें चिरा।
यज्ञ तो खरा ।। ध्रु ।।

फिरत फिरत पोर्तुगीज येथ पातला
अनुभविला नम्रभाव भारतांतला।
कोपऱ्यांत राज्याचा घाट घातला
भ्रष्ट करी भूमंदिर, फार मातला।
भांडुनी करा।
मुक्त मंदिरा।
कंठनाळ शत्रूचा सायकें चिरा।
यज्ञ तो खरा ।। १ ।।

मोडती मराठे जैं शत्रुचा कणा
पाठ फिरे तोंच उभा राहिला पुन्हा।
चिमणाजी शौर्याने करित कंदना
हटला, परि झाला तो नामशेष ना।
धन्व सावरा।
योजुनी शरा।
कंठनाळ शत्रूचा सायकें चिरा।
यज्ञ तो खरा ।। २ ।।

## गोवा मुक्ति-यज्ञ

पेटलें प्रचंड कुंड यज्ञदेवता –
तरुणरक्त हवनाला मागते स्वतां ।
दुष्ट फिरंगी हटवा मार मारतां ।
विजयाचा आणा हवि मुक्त भारता
जा त्वरा करा ।
संगरीं मरा ।
कंठनाळ शत्रूचा सायकें चिरा ।
यज्ञ तो खरा ।। ३ ।।



माईंचें आयुष्य संपत आलें. जीवनभर तात्यांचा एक पाय घरांत तर एक बंदघरांत होता. जितका विजनवास तात्यांना तितकाच माईंना. अधिक म्हणजे समाजाची छळणूक आणि मनावर चिंतेची टांगती धार !

दि. २४–११–१९६३ ला माईंचें देहावसान झालें. क्रांतिकार्यांत प्रत्यक्षा-प्रत्यक्ष सहभागी असणारा जिवाभावाचा शेवटचा दुवा हरपला.

अहेवपणीं मरण म्हणजे आयुष्याचें सोनें ! मरतांना माईंना तो संतोष होता. तात्यांना भूतकाल आठवणें स्वाभाविक होतें. पण अशक्य वाटणारा संसार झाल: हें त्यांचें समाधान होतें.

## ५०

गेली वहिनी, गेला बाबा। बाळालाही नेत विधाता।
सखे, प्रेमले ! तूं अंतरतां। सरल्या गाठी भेटी आता।

बोहल्यावरी जडलें नातें।
जीव जिवाशी विणले होते।
तोडी नियती संबंधातें।
काळाचा कर तुजला शिवतां। सरल्या गाठी भेटी आता ।। १ ।।

हाक भूमिची येतां कानीं।
गेलों उठुनी शय्येवरुनी।
तुझ्या संगतीला विरहाग्नी।
पावक विझला मिटली चिता। सरल्या गाठी भेटी आता ।। २ ।।

भिन्न स्थानें होतीं अपुलीं।
एकजिवानें कार्यें केलीं।
कडू गोड वा फळें चाखलीं।
कार्यामधुनी तूं उन्मुक्ता। सरल्या गाठी भेटी आता ।। ३ ।।

होता मजला नियतीचा वर।
म्हणुनी आलों उतरुनि सागर।
आणि मोडलें दैत्यांचें घर।
येत शांतता झंझावाता। सरल्या गाठी भेटी आता ।। ४ ।।

## माईंचा मृत्यू

नव्हता संभव संसाराचा ।
सहचर्याचा, सहवासाचा ।
लाभ नव्हे कां हा दोघांचा ।
पुत्र-पौत्रसुख आले बघतां । सरल्या गाठी भेटी आतां ।। ५ ।।

फार तुला श्रम, थोडे मजला ।
घास घास अश्रूंनी भिजला ।
साह्य मिळे देवाचें तुजला ।
घेई अंकीं तुला देवता । सरल्या गाठी भेटी आतां ।। ६ ।।

कष्टाचें अन् सौभाग्याचें ।
वागविलें तूं भूषण साचें ।
सोने झालें आयुष्याचें ।
कीर्ति ठेवुनी देहा त्यजितां । सरल्या गाठी भेटी आतां ।। ७ ।

कार्य इथें माझेंही सरलें ।
जिणें येथलें थोडें उरलें ।
कंकण आयुष्याला पुरलें ।
मिळेन मीही शीघ्र अतीता । सरल्या गाठी भेटी आतां ।। ८ ।।



"आपल्या सीमांचें रक्षण करा. भ्रांत राहिलात तर राष्ट्रघात होईल. शस्त्र-पूजा करा. सैन्य आक्रमक पाहिजे. त्याच वेळीं शत्रू वचकून असतात.

"उत्तम तत्त्वांच्या रक्षणासाठीच सैन्यबल वाढविले पाहिजे. "शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते!"

स्वातंत्र्यवीर सावरकरांचें असें अट्टाहासाचें गाणें शासन स्वत:च गाऊं लागलें. सप्टेंबर १९६५ मध्ये पाकिस्तानचें आक्रमण थोपवून धरलें गेलें.

# ५१

सेना समरांगणीं रंगली तुझे पवाडे गात्
ध्वम, उध्वस्तक साथ्, समेला तोफांची बरसात् ।

लोक बुडबुडे शोधत होते ।
मुक्या मनाने उधळायातें ।
वीरश्रीने भरतां रव ते ।
फुटती आकाशांत् । समेला तोफांची बरसात् ।। १ ।।

शत्रु भारताने ओळखला ।
नेम साधला प्रहार केला ।
आघाताने होय रिपूला ।
कारुण्याची रात् । समेला तोफांची बरसात् । ।। २ ।।


श्रवणाने रणदेव रंगला ।
विराम आला आरोहाला ।
पडे यवनिका ! नेता भुलला ।
रिपुच्या जंजाळात् । समेला तोफांची बरसात् ।। ३ ।।

स्वातंत्र्यवीरांच्या द्रष्टेपणावर चोरून, मुक्या मनाने उधळण्यासाठी गोळा केलेले शब्दांचे बुडबुडे भरीव होत होत त्या वेळीं तोफांच्या मुखांतून धुमधडाका करूं लागले.

युद्धाची यवनिका ( पडदा ) पडली. शास्त्रीजी फसले. ताश्कंदने त्यांना खाल्लें. वेळ येतांच स्वातंत्र्यवीरांचे पोवाडे पुनः समर्थपणें म्हणण्यास सैनिक सिद्ध आहेत.

## सेना समरांगणी रंगली

आम्ही सैनिक ठाकलों खडे ।
पुनरपि गाण्या तुझे पवाडे ।
स्फोटांचे वाजवूं चौघडे ।
शत्रूच्या शिबिरांत् । समेला तोफांची बरसात् ।। ४ ।।



जीवनाला मर्यादा आहेच. एका जन्मांत जेवढें होणें शक्य असतें तेवढें झालें, मी पाहिलें, धन्य झालों ! आता जगणें म्हणजे भार होऊन राहाणें !

आता जीवनत्यागाला समाधि, आत्मार्पण म्हणणेंच उचित. कांहीहि म्हणा, माझें कार्य झालें, मी चाललों !

सावरकरांनीं आपली जीवनयात्रा स्वत:च्या इच्छेने २६–२–६६ ला संपविली !

# ५२

झाले जीवनकार्य पुरें जर । होऊं मी कां भार धरेवर ।। ध्रु० ।।

तत्त्वें पांचहि विणती जीवन ।
समय धरी कर, नेई वाहुन ।
ज्ञात जगाच्या मर्यादेतुन ।
सीमा सरतां मृत्यूचे घर । होऊं मी कां भार धरेवर ।। १ ।।

जिथे जन्मलों जिथे वाढलों ।
भूच्या त्या चिंतनीं लागलों ।
तिच्या अंशत: कामीं आलों ।
करूं पाहतां मन जन्मान्तर । होऊं मी कां भार धरेवर ।। २ ।।

भट्ट कुमारिल, गौरांग मुनी ।
अपुले अपुले कार्य उरकुनी ।
सद्धि साधती, पृथ्वी त्यजुनी ।
गुहेंत गेले श्रीज्ञानेश्वर । होऊं मी कां भार धरेवर ।। ३ ।।

जगद्गुरूंचा रव दुमदुमला ।
बौद्धिक पक्षाघात संपला ।
ध्वज हिंदूंचा उन्नत झाला ।
देह फेकती प्रसन्न शंकर । होऊं मी का भार धरेवर ।।४।।

# होऊं मी का भार धरेवर

शक्ति लाभली पंचत्वांतुन ।
घडवायाला भूमि सचेतन ।
रक्ताश्रूंचे केलें सिंचन
धन्य धन्य मी । दिसला अंकुर । होऊं मी का भार धरेवर ।।५।।

उघडे मीं हृन्नेत्र ठेवले ।
इष्ट तेवढें हृदांत भरलें ।
त्याज्य काय लोकांना कथिलें ।
गात भैरवी थकलेला स्वर । होऊं मी का भार धरेवर ।।६।।



जाऊं द्यावें अमुच्या गावा ।
रामराम जगता सांगावा ।
घेतों अज्ञातांत विसावा ।
येतों ! वसुधे ! मला क्षमा कर । होऊं मी का भार धरेवर ।।७।।

पित्याकडून मुलांनीं सावरकर-चरित्र ऐकलें. मुलांनी आपल्या भावना प्रकट केल्या –

## ५३ तुझे रे कळलें जीवनसार

स्वातंत्र्याच्या वीरा आम्हां कळलें जीवनसार ।
तुझें रे कळलें जीवनसार ।
तव नवजन्मीं पाहशील तूं स्वप्न तुझें साकार
भारतीं स्वप्न तुझें साकार ॥ ध्रु० ॥

तेजस्वींचें तेज तूं स्वतां ।
धर्मक्षेत्रीं कृष्ण भारता ।
द्रष्टा, गीतेचा उद्गाता ।
आम्ही ठेवूं जागृत गीता करण्या आत्मोद्धार
तुझें रे कळलें जीवनसार ॥ १ ॥

रुद्रांमध्ये असशी तूं हर ।
आयुधांतला वज्र भयंकर ।
क्रांतिकारकांचा सावरकर ।
देशाचा अणु-रेणु-रूप तूं, राष्ट्राचा ओंकार
तुझें रे कळलें जीवनसार ॥ २ ॥

राष्ट्राने द्यावें तुज वंदन ।
असा तुझा तत्त्वार्थ चिरंतन ।
देशासाठी होतां मंथन ।
होइल पश्चिम, पूर्वा, दक्षिण, उत्तरभर विस्तार
तुझें रे कळलें जीवनसार ॥ ३ ॥



REFBK-0017543
दा. क्र. १७५८३
५८४९५ काव्य
११।३।७१